गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणूक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे.हरी बाळाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २०.०९.२०२५ | अंक नं. १४५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

किमान 20% किंवा
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना..
तेवढी टक्के मजुरीत सूट..
उत्सव मजुरीचा
- ऑफरचे शेवटचे 2 दिवस -
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
योजनेचा नियम : सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू.
सुवर्णसमृध्दी योजना
मासिक 10 हप्ते भरा व सोने खरेदी करतांना भरघोस फायद्यासह मजुरीत 10% सूट मिळवा.
लकी गोल्ड योजना
100% मजुरीत सूट
मासिक 11 हप्ते भरा व सोने खरेदी करतांना मजुरीत 100% सूट मिळवा.
Conditions Apply*

# मनपाच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागात सावळागोंधळ
# हेलपाटे मारूनही दाखले मिळेनात, नागरिक झाले त्रस्त

नगर – महापालिकेच्या माळीवाडा येथील जुन्या इमारती मध्ये असलेल्या जन्म, मृत्यू नोंदणी विभागात प्रचंड सावळा गोंधळ सुरु असून वारंवार हेलपाटे मारूनही दाखले मिळत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. याबाबत नागरिकाने आयुक्तांना निवेदन देवून याकडे त्यांचे लक्ष वेधले आहे.

या निवेदनात सावेडी उपनगरातील प्रमोदकुमार ताराचंद छाजेड यांनी म्हटले आहे की, महापालिकेच्या माळीवाडा येथील जन्म मृत्यू नोंदणी विभागात सकाळी ठीक १० वाजता कामकाज सुरू होत नाही, या ठिकाणी दाखले मिळण्याकरिता प्रथम अर्ज करण्यासाठी जे माहिती सुविधा केंद्र आहे तेथे तर स्वच्छता तर नाहीच पण व्यवस्थित मार्गदर्शक फलक नाही, वर चढून जाण्यास जिना तर फार जुना आहे.

येथे ३ खिडक्या आहेत पण दाखला देण्यास एकच खिडकी आहे तेथे दाखला दिलेल्या तारखेस मिळत नाही, कुठलाही मार्गदर्शक फलक नाही, जन्म मृत्यू, विवाह निबंधक भेटत नाहीत, ते दुसऱ्या व्यक्तीस भेटा म्हणतात, ती व्यक्ती तिसऱ्या व्यक्तीकडे पाठवते. कार्यालयात त्यांचा नाव व हुद्दा कुठेच लिहिलेला नाही, त्यामुळे नागरिक गोंधळून जातात. दिलेल्या तारखेस दाखला तयार नसल्यास तसा मार्गदर्शक फलक लिहला तर नागरिक रांगेत उभे राहणार नाही. पण जो तो अधिकारी मदत तर करत नाही पण व्यवस्थेकडे बोट दाखवून आम्ही काय करणार, कर्मचारी नाहीत असे उत्तर देतात. त्यामुळे प्रशासन सांभाळणारे अधिकारी यांनी याचा आढावा घेतला पाहिजे, अडचणी जाणून घेतल्या पाहिजेत.

मला दाखला मिळण्याची तारीख १५ सप्टेंबर देण्यात आली होती. त्यामुळे गेले ४ दिवस सलग चकरा मारल्यानंतर एका कर्मचाऱ्याने तुम्ही १ ऑक्टोबरनंतर या, तोपर्यंत तुमचा दाखला तयार होईल असे सांगितले. हे जर अगोदर सांगितले असते किंवा टोकनवर तारीख ती दिली असती तर चकरा मारण्याची वेळ आली नसती. माझ्यासारख्या अनेक नागरिकांना असाच अनुभव दररोज येत आहे. त्यामुळे याबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

नवरात्री स्पेशल
उपवासासाठी स्पेशल टक्कर मलाई लस्सी
कैलास उडपी। लस्सी
शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, पिराजवळ, अहिल्यानगर.
शाखा नं. २ : तहसील कार्यालय समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.
शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.

## महिलेच्या घरातून भरदिवसा दागिन्यांची चोरी

नगर – नातेवाईकांच्या अंत्यविधीसाठी नालेगाव अमरधाम येथे गेलेल्या महिलेचे घर अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा फोडून घरात उचकापाचक करत कपाटातील ९० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची घटना शहरातील सिव्हील हडको परिसरात असलेल्या निसार हॉस्पिटल शेजारी १८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत सुशिला परशुराम राऊत (वय ७०, रा. निसार हॉस्पिटल मागे, सिव्हील हडको) यांनी १९ सप्टेंबर रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांची मुलगी या दोघी १८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता नातेवाईकांच्या अंत्यविधीसाठी नालेगाव अमरधाम येथे गेल्या होत्या. त्या दुपारी १.३० वाजता परत आल्या. या कालावधीत अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरात घुसून कपाटात ठेवलेले ९० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुध्द बीएनएस कलम ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## संशयितरित्या फिरणाऱ्या तिघा जणांना पकडले

नगर – रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्या तिघांना एमआयडीसी व नगर तालुका पोलिसांनी पकडले असून त्यांच्याविरूध्द पोलीस ठाण्यात वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

विकास ऊर्फ विकी पावलस जावळे (वय २४ रा. गजानन कॉलनी, नवनागापूर) हा १७ सप्टेंबर रोजी रात्री ११.२२ वाजताच्या दरम्यान काकासाहेब म्हस्के कॉलेज, आंबेडकर चौक, नागापूर येथे एका टपरीच्या आडोशाला मिळून आला. त्याला एमआयडीसी पोलिसांच्या गस्ती पथकाने ताब्यात घेत त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. महेश कडुबाळ सोनवणे (वय २९ रा. गळनिंब, ता. नेवासा), तेजस दीपक गायकवाड (वय ३६ रा. पिंपळगाव रस्ता, तपोवन, अहिल्यानगर, मुळ रा. माणिकदौंडी, ता. पाथर्डी) यांना १८ सप्टेंबर रोजी रात्री १२.१५ वाजताच्या दरम्यान नगर – पुणे महामार्गावर कामरगाव (ता. नगर) शिवारात मनबावडी टॉवर जवळ नगर तालुका पोलिसांच्या गस्ती पथकाने पकडले. त्यांच्याविरूध्द नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सर्व भाविक भक्तांना नवरात्रीनिमित्त हार्दिक शुभेच्छा..
मा.श्री. अविनाश देडगांवकर
सेवा गौरव पुरस्कार प्राप्त समाजसेवक, अहिल्यानगर

राजमोती साबुदाना
एक्स्ट्रॉ सुपरफाइन साबुदाना
इन्स्टंट साबुदानासुद्धा उपलब्ध!
RAJ MOTI
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
नवरात्र उत्सवातील उपवासांसाठी
१ किलो । ५०० ग्रॅम । २५० ग्रॅम
-: स्टॉकिस्ट :-
मे. कांतीलाल घेवरचंद शिंगवी
दाळ मंडई, अहमदनगर.
फोन : 2344823/9422220723
आजच आपल्या जवळच्या दुकानदाराकडे मागणी करा!

## जॉगींग पार्क येथील विजेच्या खांबांवरील वायर्समुळे नागरिकांच्या जिवीतास धोका

### अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष



नगर – सावेडी येथील मेजर दिनूभाऊ कुलकर्णी क्रीडा संकुल (जॉगिंग पार्क) येथील विजेच्या खांबांवरील असलेल्या वायर्स उघड्या असून त्यावरील झाकणे काढून टाकण्यात आली आहेत. येथे सकाळी व संध्याकाळी परिसरातील अबालवृद्ध फिरावयास तसेच व्यायामासाठी येत असतात. एखाद्याचा या वायर्सशी स्पर्श झाल्यास त्याला शॉक बसण्याची शक्यता नाकारता येणार नाही. एखादा अपघात होऊन एखादी व्यक्ती जखमी झाल्यास अथवा दगावल्यास स्थानिक प्रशासनाला जाग येणार का? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

विजेच्या खंबाला अगदी खेटूनच बाकडे बसविण्यात आले असून पावसाच्या पाण्यात वीज प्रवाह उतरण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही. महापालिका विद्युत प्रशासन, स्थानिक लोकप्रतिनिधी यांना वारंवार मागणी करूनही याची दाखल घेतली जात नाही.

येथे वेगवेगळे खेळ खेळण्यासाठी लहान मुले येत असतात, त्यांच्या जिवितास देखील यामुळे धोका निर्माण झाला आहे. येथील घसरगुंडी, सिसॉ वगैरे खेळण्यांचीही दुरावस्था झाली आहे. यातच भर की काय म्हणून पावसामुळे येथे चिखल झाला असून सखल भागात पाण्याचे तळे साचत आहे. एकीकडे आयुक्त डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियान राबवत असून येथील परिसरात अस्वच्छता निर्माण होऊन डासांचाही प्रादुर्भाव होत आहे. असा दुराभास दिसून येत आहे. डेंग्यूचा प्रसार होऊ शकतो.

ट्रॅकवरून फिरताना ज्येष्ठ नागरिकांचाही पाय घसरून अपघात होऊ शकतो. तरी याबाबत प्रशासनाने उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



शहरात धोकादायक इमारती मुळे काही दुर्घटना घडून कोणाला जीवित हानी होऊ नये यासाठी डाळ मंडई येथील सदर धोकादायक इमारत पाडताना महापालिकेच्या अग्निशामक विभागाचे कर्मचारी (छाया – धनेश कटारिया)

महासेल...ऑफर
शनिवार दि.२० व रविवार दि. २१ सप्टेंबर २०२५ रोजी फक्त दोनच दिवस ऑफर उपलब्ध
* लेडिज पर्स - रु. ५०/- पासून पुढे
* हॅण्डबॅग - रु.२००/- पासून पुढे
* हाऊस होल्ड अँटम - रु.५०/- पासून पुढे
* क्रॉकरी - कॉफी मग रु.५०/- पासून पुढे व ६ कपसेट रु.१००/-पासून पुढे व अजुनही भारीमध्ये भरपूर व्हराइटी
Terms & Conditions Apply.
मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२७११८८

2 LAST DAYS
Gehena
A Premium Jewellery Exhibition
परंपरा आणि आधुनिकतेची अनोखी सांगड...
19-20-21 सप्टेंबर 2025
आयरिस हॉटेल अहिल्यानगर.
सर्वोत्तम दागिन्यांचे प्रदर्शन
वेळ: सकाळी १०:३० ते रात्री ८:३०
Follow us : times_gehena

21st Sept.
भारतीय जनता पार्टी, अहिल्यानगर , वकिल सेलचे अध्यक्ष
ॲड.चंदन बारटक्के
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
ॲड. संदिप काळे
ॲड. सौरभ राऊत
ॲड. राहुल रासकर
ॲड. कैलास कोतकर
ॲड. रावसाहेब चौधरी
ॲड. योगेश मांडोत
ॲड. वर्धमान भंडारी
ॲड. रविंद्र लगड
ॲड. व्यंकटेश शिरसुल
ॲड. सचिन घावटे
ॲड. निखिल मुसळे
ॲड. रुपेश भांमरे
ॲड. हरेश कल्याणी
ॲड. किरण वनारसे
ॲड. विजय महाजन
ॲड. देवेंद्र बंब
ॲड. संतोष भोसे
ॲड. अविनाश साखला
ॲड. आशिष पोटे
भारतीय जनता पार्टी, वकिल आघाडी, सर्व पदाधिकारी, अहिल्यानगर.
अहिल्यानगरवासियांना विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा..

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगर–पुणे महामार्गावर दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी पकडली

## गावठी कट्टा, तलवार, गिलवर, बेसबॉल दांडक्यांसह इनोव्हा कार जप्त

नगर – नगर – पुणे महामार्गावर चास घाटाजवळ दरोड्याच्या तयारीत असलेला कुख्यात गुंड गौरव घायाळ सह त्याच्या ४ साथीदारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २० सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास पकडले आहे. या टोळीकडून गावठी कट्टा, जिवंत काडतुसे, तलवार, गिलवर, बेसबॉल दांडक्यांसह इनोव्हा कार जप्त करण्यात आली आहे.



नगर – पुणे महामार्गावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेली टोळी पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार पो.नि. किरणकुमार कबाडी यांनी नेमलेल्या पथकातील स.पो.नि. हरिष भोये, उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार लक्ष्मण खोकले, हृदय घोडके, दिपक घाटकर, राहुल द्वारके, सुरेश माळी, अतुल लोटके, भिमराज खर्से, बाळासाहेब नागरगोजे, रिचर्ड गायकवाड, राहुल डोखे, सोमनाथ झांबरे, भगवान थोरात, विशाल तनपुरे, योगेश कर्डिले, भगवान धुळे, महादेव भांड यांचे पथक रात्री नगर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत दरोडा प्रतिबंधक पेट्रोलिंग गस्त करत असताना स.पो.नि.हरिष भोये यांना नगर ते पुणे जाणारे रोडवर चास घाटाजवळ एक काळ्या रंगाचे इनोव्हा कार (क्र. एम. एच. ०१ व्ही. ए. ७४२२) मधुन कुख्यात गुंड गौरव घायाळ व त्याचे साथीदार घातक हत्यारांसह दरोडा टाकण्याच्या तयारीत थांबलेले असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

ही माहिती मिळताच पथकाने तात्काळ तिकडे धाव घेतली. पहाटे ३.५० च्या सुमारास त्यांना चास घाटाच्या अलीकडे एक काळ्या रंगाची इनोव्हा कार रोडच्या कडेला अंधारामध्ये थांबल्याचे दिसुन आले. पथकाने तेथे छापा घालून गौरव हरीभाऊ घायाळ (वय २४ रा. सुपा, ता. पारनेर), सतिष बाळासाहेब पावडे (वय ३५, मुळ रा. दरोडी, ता. पारनेर हल्ली रा. सुपा), अनिकेत रमेश साळवे (वय २९, रा.ओम एन्टरप्रायजेसच्या पाठीमागे, सुपा), विशाल सुरेश जाधव (वय २३, रा. आपधुप रोड, सुपा), गोविंद बबनराव गाडे (वय ३६, रा. ग्रामपंचायत मागे, सुपा) यांना शिताफीने पकडले.

त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या कडे १ गावठी पिस्टल व १ जिवंत काडतुस, १ तलवार, गिलवर, बेसबॉलचा दांडका, ६ वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल, एक इनोव्हा चारचाकी वाहन असा एकुण ७ लाख ९० हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला, तो जप्त करण्यात आला आहे.

यातील आरोपी गौरव हरीभाऊ घायाळ याच्या विरुद्ध पारनेर पोलिस ठाण्यात १ नगरच्या एमआयडीसी पोलिस ठाण्यात १ आणि सुपा पोलिस ठाण्यात ७ असे ९ गुन्हे दाखल आहेत. पकडलेल्या सर्व आरोपीविरुद्ध नगर तालुका पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१० (४), ३१० (५), ३१० (६), आर्म ॲक्ट ३/२५, ४/२५ प्रमाणे दरोडा तयारीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शालेय शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करावेत

नगर – दिव्यांग कल्याण विभागामार्फत शालेय शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी (१ ली ते १० वी) शिष्यवृत्तीची योजना राबविली जाते. सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मिळण्यासाठी सामान्य शाळेतील दिव्यांग विद्यार्थी व विशेष शाळेतील अनिवासी विद्यार्थी यांचे ऑफलाईन अर्ज मुख्याध्यापकांमार्फत विवरणपत्र–अ सह ३० सप्टेंबर पर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

अर्जासोबत दिव्यांग प्रमाणपत्र, यूडीआयडी कार्ड, विद्यार्थ्याचे बँक पासबुकची छायांकित प्रत, मागील वर्षाचे गुणपत्रक आदी जोडून सादर करावेत, असेही कळविण्यात आले आहे.

# मनपा निवडणुकीसाठी वोट चोरी पेक्षाही भयानक षड्यंत्र

## ठाकरे शिवसेनेचा आरोप; सुनवणी वेळी शहरप्रमुख काळेंनी आयुक्त यशवंत डांगे यांना धरले धारेवर




नगर – मनपा निवडणूक करिता प्रारूप प्रभाग रचना जाहीर करून १५ सप्टेंबर पर्यंत हरकती, सुचना मागविण्यात आल्या होत्या. त्यावर ठाकरे शिवसेनेच्या वतीने शहरप्रमुख किरण काळे यांनी सर्व प्रभागांमध्ये मिळून एकूण १४ हरकती घेतल्या होत्या. जिल्हाधिकारी यांच्यासमोर हरकतींची सुनावणी सुरू असताना मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद नद्या, नाले, रेल्वे पूल, रस्ते यांना न ओलांडण्याच्या सूचना असताना देखील सत्ताधाऱ्यांना लाभ होईल अशाप्रकारे रचना केल्याचा युक्तिवाद पुराव्यांसह हरकत मांडत ठाकरे सेनेने केला. यावेळी अधिकाऱ्यांसह शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसमोरच काळे यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना धारेवर धरले. यावेळी डांगे निरुत्तर झाले. सत्तेचा गैरवापर करून मनपा निवडणुक रडीचा डाव खेळत जिंकण्यासाठी वोट चोरी पेक्षाही भयानक षडयंत्र सत्ताधारी आणि अधिकारी यांनी संगनमत करून रचले असल्याचा आरोप सुनावणी नंतर काळे यांनी केला आहे.

सन २०१८ च्या रचनेतील प्रभाग ७ मधील नागापूर गावठाण नव्या रचनेमध्ये प्रभाग १ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. सुमारे २२०० ते २४०० मतदान यामध्ये वळवण्यात आले आहे. यावर काळेंनी युक्तिवाद करताना म्हटले की, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे नद्या न ओलांडण्याच्या सूचना असताना देखील अशी कोणती अपरिहार्यता निर्माण झाली की नदी ओलांडून नागापूर गावठाण प्रभाग १ मध्ये समाविष्ट केले ? त्यावर आयुक्त डांगे यांनी प्रत्युत्तर देताना सांगितले की, आम्ही नगर मनमाड रस्ता हा निकष पकडला. यावर संतप्त होत काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना प्रभाग १७ मध्ये रेल्वे रूळ, रेल्वे फ्लाय ओव्हर, नगर दौंड रोड ओलांडला गेला, प्रभाग १३ मध्ये उड्डाणपूल, तर प्रभाग ५ मध्ये नगर मनमाड रोड, पत्रकार चौक ते डीएसपी चौक रोड नगर छत्रपती संभाजीनगर रोड ओलांडले गेले हे निदर्शनास आणून दिले. काळे म्हणाले तेही बेकायदेशीरच होते. तिथे नियम धाब्यावर बसवता आणि प्रभाग १ मध्ये नगर मनमाड रोड निकषात पकडल्याचे सांगता, असे यावेळी काळे यांनी आयुक्तांना सुनावले.

काळे यांनी आयुक्त हे शहराच्या लोकप्रतिनिधींच्या शिफारशीने खुर्चीवर विराजमान झाले आहेत. प्रभाग १ मध्ये सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे चार नगरसेवक आहेत. त्यांची राजकीय सोय करण्यासाठी हा विशेष फेवर आयुक्तांनी राजकीय संगनमत आणि दबावातून केल्याचा आरोप केला. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी काळे यांना रोखले. मात्र काळे यांनी प्रभाग १ आणि ८ मधील नागरिकांना न्याय देण्याची मागणी लावून धरली.

अधिकाऱ्यांनी यावेळी प्रभाग ८ ची लोकसंख्या १९,८१२ असल्याचे सांगितले. त्यामुळे प्रभाग १ मध्ये भाग समाविष्ट केल्याचे दुसरे उत्तर दिले. त्यावर हरकत घेत शासनाच्या निकषां प्रमाणे एका प्रभागात २२,४३७ लोकसंख्ये पर्यंत समावेश करता येऊ शकत असताना देखील राजकीय दबावातून नागापूर गावठाण हलविण्यात आल्याचा आक्षेप घेतला. याच बरोबर काळे यांनी सन २०१८ च्या रचनेतील ठाकरे शिवसेनेचा बालेकिल्ला असणाऱ्या प्रभाग ७, ८, १०, १२, १३, १५, १६ यांची मोडतोड करण्यात आल्याबाबत देखील आक्षेप घेतला.

### मागासवर्गीय, अल्पसंख्यांक समाज टार्गेट

सर्वच प्रभागांमध्ये मागासवर्गीय तसेच अल्पसंख्यांक समाजाला विशेष टारगेट केल्याचा आरोप यावेळी ठाकरे शिवसेनेने केला. निवडणूक आयोग पारदर्शक आणि मुक्त वातावरणात व्हायला हव्यात. मात्र निवडणूक आयोग, प्रशासन हे भारतीय संविधान धाब्यावर बसवून अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीची पूर्वतयारी ही सत्ताधाऱ्यांच्या राजकीय लाभाची करून नागरिकांना मात्र वेठीस धरत असल्याचा आरोप ठाकरे शिवसेनेने केला आहे.

अधिकारी बदल्या करून जातील, पण पुढे काय ? : यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसमोर युक्तिवाद करत असताना किरण काळे म्हणाले, अधिकारी तीन वर्षानंतर बदली होऊन निघून जातील. अधिकाऱ्यांना काय फरक पडतो ? पण या शहराच्या आमच्या नागरिकांना संपूर्ण आयुष्य या शहरात व्यथित करायचा आहे. राजकीय दबावातून प्रभागांची अशाप्रकारे मोडतोड करून तुम्ही नगरकरांना वेठीस का धरता असा संतप्त सवाल यावेळी काळेंनी केला.

# तिळवण तेली समाज मंदिरात २२ सप्टेंबरपासून शारदीय नवरात्र उत्सवनिमित्त विविध कार्यक्रम



नगर – अहिल्यानगरच्या दाळमंडई येथील तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने शारदीय नवरात्र उत्सव निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ट्रस्टच्या अध्यक्षा निता लोखंडे यांनी दिली.

या शारदीय नवरात्र निमित्त २२ सप्टेंबर रोजी दु. १२ वा. घटस्थापना, २३ सप्टेंबर रोजी स.दैनंदिन पुजा व संध्याकाळी ७.३० आरती, २४ सप्टेंबर रोजी दु.३ वा. श्री देवीची नित्योपचार महापुजा– कुंकुमार्चन कार्यक्रम, २५ सप्टेंबर रोजी श्री देवीची नित्योपचार महापुजा– आरती,२६ सप्टेंबर रोजी श्री देवीची नित्यपूजा–दुपारी ३ वाजता सप्तशदी पाठ, २७ सप्टेंबर रोजी श्री देवीची नित्यपूजा, २८ सप्टेंबर रोजी श्री देवीची नित्यपूजा, दुर्गा भजनी मंडळाचे दुपारी ३ वाजता भजनाचा कार्यक्रम तसेच रात्री ९ वाजता श्री तुळजापुरच्या तुळाजाभवानी पालखी मिरवणुक व पालखी आगमन, २९ सप्टेंबर रोजी दुर्गाष्टमी श्री देवीची नित्यपूजा, ३० सप्टेंबर रोजी श्री देवीची नित्योपचार महापूजा आरती आणि दुपारी ३ वाजतावैदिक होमास प्रारंभआणि साय ६ वाजता पूर्णाहुती, १ ऑक्टोबर रोजी श्री देवीची नित्योपचार महापूजा, २ ऑक्टोबर रोजी विजयादशमी (दसरा) श्री देविची नित्योपचार महापूजा, संध्या. ७ वा. सिमोलंघन मंदिराभोवती पालखी मिरवणूक व मंचकी निद्री असे कार्यक्रम होतील.

तसेच दररोज दु.४ वाजता श्री सरस्वती भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम, दररोज संध्याकाळी देवीची संबळ वादनावर आरती होणार आहे. तसेच ९ दिवस देवीची विविध रुपे साकरण्यात येणार आहे. या शारदीय नवरात्र उत्सावानिमित्त आयोजित कार्यक्रमांचा भाविकांनीउपस्थित रहण्याचे आवाहन उपाध्यक्षा शोभना धारक यांनी केले आहे.

नवरात्र उत्सव यशस्वीतेसाठी ट्रस्टच्या अध्यक्षा सौ. निता लोखंडे, उपाध्यक्षा सौ. शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त प्रसाद शिंदे, मनोज क्षिरसागर, सागर काळे, दत्तात्रय डोळसे, गोकुळ कोटकर आदी प्रयत्नशिल आहे. सर्व कार्यक्रम तिळवण तेली समाज ट्रस्टच्या श्री संताजी भवन, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, तेली पंचाचा वाडा, दाळमंडई येथील होतील.

# नगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट'; नागरिकांनी घ्यावी विशेष दक्षता

नगर – भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार १९ ते २३ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर जिल्ह्यात वीजांचा कडकडाट, जोरदार वारे व मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जारी करून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

नद्यांच्या विसर्गात वाढ; पूरस्थितीचा धोका पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणांमधून पाण्याचा विसर्ग वाढला असून त्यामुळे जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

सध्या भिमा नदीवर दौंड पूल येथे १२,३५० क्युसेक, गोदावरी नदीवरील नांदूर मध्यमेश्वर धरणातून ४७६९ क्युसेक, प्रवरा नदीवरील निळवंडे धरणातून ७०० क्युसेक, ओझर बंधारा १,११५ क्युसेक, मुळा धरणातून १०,००० क्युसेक, घोड धरणातून ७००० क्युसेक, सीना धरणातून १,६२८ क्युसेक, कुकडी नदीवरील येडगांव धरणातून ७५० क्युसेक, हंगा नदीवरील विसापूर धरणातून ३५० क्युसेक इतका विसर्ग सुरू आहे.

प्रशासनाकडून नागरिकांना सूचना – मेघगर्जना होत असताना झाडाखाली, टॉवर, ध्वजांचे खांब किंवा धोकादायक ठिकाणी उभे राहू नये. विद्युत उपकरणांचा वापर टाळावा., नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी पाणीपातळी वाढल्यास सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. पाण्याने भरलेले पूल ओलांडू नयेत., मोकळ्या जागी असल्यास गुडघ्यावर बसून डोके झाकून घ्यावे., जनावरांचे स्थलांतर सुरक्षित ठिकाणी करावे व शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी नियोजन करावे., पर्यटनासाठी धरणे, नद्या व धबधब्यांच्या परिसरात जाणे टाळावे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रांमध्ये पाण्याच्या प्रवाहाजवळ जाण्याचे टाळावे., आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा., जिल्हा नियंत्रण कक्षाचा टोल–फ्री क्रमांक १०७७ असून दूरध्वनी क्रमांक ०२४१–२३२३८४४ व २३५६९४० उपलब्ध आहेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# श्रीराम मंदिरात चोरी करणाऱ्या ३ सराईत आरोपींना अटक

## चोरलेले दागिने हस्तगत, पोलिस अधिक्षकांच्या हस्ते ग्रामस्थांकडे सुपूर्द

नगर – नगर तालुक्यातील शिंगवे नाईक परिसरातील श्रीराम मंदिर, भैरवनाथ मंदिर आणि सावता महाराज मंदिरात झालेल्या चोरीचा अखेर उलगडा झाला असून एमआयडीसी पोलिसांनी अवघ्या तीन दिवसांत तीन सराईत आरोपींना गजाआड केले आहे. त्यांच्याकडून १ लाख ३ हजार किमतीचा सोन्या–चांदीच्या दागिन्यांसह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त केलेला मुद्देमाल पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते मंदिर व्यवस्थापनाला परत देण्यात आला.



शिंगवे नाईक (ता.नगर) येथील मंदिरातून चोरलेले दागिने चोरट्यांकडून हस्तगत केल्यावर ते मंदिर व्यवस्थापनाकडे सुपूर्द करताना पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, स.पो.नि. माणिक चौधरी व पोलिसांचे पथक.

१५ सप्टेंबर रोजी विवेक लक्ष्मण शिंदे (रा. शिंगवे नाईक) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी तीन मंदिरांचे कुलूप तोडून सोन्याचे व चांदीचे दागिने, पंचधातूचे मुकुट, तसेच ५० हजार रोख अशा एकूण १ लाख ३३ हजार किमतीचा मुद्देमाल लंपास केला होता. याशिवाय सावता महाराज मंदिरात तोडफोड व भैरवनाथ मंदिरातील दानपेटी फोडून १ हजार ५०० रुपये चोरीला गेले होते. या घटनेनंतर गावकरी व भाविकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली होती. गुन्हा दाखल होताच अधीक्षक घार्गे यांनी जलद व काटेकोर तपासाच्या सूचना दिल्या.

तपासादरम्यान एमआयडीसी चे स.पो.नि. माणिक बी. चौधरी यांना गोपनीय माहिती मिळाली की, सराईत आरोपी किशोर तुकाराम बर्डे (रा. वरवंडी, ता. राहुरी) या गुन्ह्यात सामील आहे. पोलिसांनी त्याला मुळा डॅम परिसरात सापळा रचूनअटक केली. चौकशीत त्याने आपल्या साथीदारांसह चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्या माहितीनुसार राहुरी येथून त्याचे साथीदार सागर गणपत बर्डे आणि संजय बबन बर्डे (दोघे, रा. मुळानगर, मुळा डॅम, ता. राहुरी) यांना अटक करण्यात आली. चौकशीत तिघांनी मि ळूनच मंदिरातील चोरी केल्याचे स्पष्ट झाले. मुख्य आरोपी किशोर बर्डे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी दरोडा, चोरी व फसवणुकीसारखे गंभीर गुन्हे विविध पोलीस ठाण्यांत दाखल आहेत.

### ग्रामस्थांकडून ढोलताशांच्या गजरात स्वागत


संशयित आरोपींकडून चोरीस गेलेले सोन्याचे मणी, चांदीचे मुकुट, मोबाईल इत्यादी एकूण १ लाख, ३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर मुद्देमाल पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते श्रीराम मंदिर व्यवस्थापनाला परत करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी ढोलताशांच्या गजरात व फटाके वाजवून पोलिसांचे स्वागत केले.

ही कामगिरी पोलिस अधीक्षक घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. चौधरी, उपनिरीक्षक मनोज मोढे, अंमलदार राकेश खेडकर, संदीप पवार, राजु सुद्रीक, सचिन आडबल, किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, ज्ञानेश्वर आघाव, जयशिंग शिंदे, सुरज देशमुख, सचिन हरदास व राहुल गुंडु यांचे पथकाने केली आहे.

# पटवर्धन पतसंस्थेबाबत अद्याप वॉरंट आदेश नाही

नगर – रावसाहेब पटवर्धन पतसंस्थेच्या सर्व संचालक मंडळाविरुद्ध वॉरंट आदेश काढण्यात आल्याची बातमी १९ सप्टेंबर रोजी छापून आलेली आहे. मात्र याबाबत अद्याप वॉरंट आदेश पारित झालेले नसल्याचा खुलासा ठेवीदारांचे वकील ॲड. सुरेश लगड यांनी केला आहे. वास्तविक पाहता सदर पतसंस्थेच्या संचालकमंडळाविरुद्ध वॉरंट आदेश अद्याप पावेतो पारीत झालेला नाही. माझे ज्युनियर वकील यांनी न्यायालयाची मुळ फाईल न बघता वॉरंट आदेश झाले असे सांगितले, त्यामुळे मी त्यावर विश्वास ठेवून बातमी पाठवली होती, तरी सदर प्रकरणात कुणाचे जाणीवपूर्वक मन दुखावण्याचा हेतू नसल्याने याबाबत आपण दिलगिरी व्यक्त करतो असेही ॲड. लगड यांनी म्हटले आहे.

# चांदमल ताथेड यांचे संथारा व्रतात निर्वाण




नगर – डाळमंडई येथील रहिवासी चांदमल मोहनलाल ताथेड (वय ९६) यांचे १९ सप्टेंबर रोजी जैन धर्मानुसार संथारा व्रतात निर्वाण झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, ४ मुली, जावई, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. मर्चंट बँकेचे संचालक मोहन बरमेचा यांचे ते सासरे होत तर रमेश मोहनलाल ताथेड यांचे मोठे बंधू होत तसेच संतोष, विजय यांचे वडील, संजय, राकेश, संदेश, बाबाजी, विनित, परिणीत, सिद्धांत यांचे आजोबा होते.

# भूमिहीन समाजाला उपजीविकेचे साधन म्हणून शासनाने विनामोबदला जमिनीचे वाटप करावे

## १३ ऑक्टोबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा; शासकीय जमिनीवर अतिक्रमणे नियमाकुल करा : बसपाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – भूमिहीन समाजाला उपजीविकेचे साधन म्हणून शासनाने विनामोबदला जमीन वाटप करावी, तसेच जे भूमिहीन कुटुंब शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून शेती करत आहेत, त्या जमिनी त्यांच्या नावावर कायमस्वरूपी करून द्याव्यात, अशी मागणी बहुजन समाज पार्टीच्या (बसपा) शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी बसपाचे जिल्हा प्रभारी सुनील ओहळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, महासचिव राजू शिंदे, सलीम अत्तार, शहराध्यक्ष फिरोज शेख पत्रेवाले, उमाशंकर यादव आदी पदाधिकारी उपस्थित होते.



भूमिहीन समाजाला उपजीविकेचे साधन म्हणून शासनाने विनामोबदला जमीन वाटप करावी, तसेच जे भूमिहीन कुटुंब शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून शेती करत आहेत, त्या जमिनी त्यांच्या नावावर कायमस्वरूपी करून द्याव्यात, अशी मागणी बहुजन समाज पार्टीच्या (बसपा) शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटूनही दलित–आदिवासी समाजातील मोठा वर्ग अजूनही भूमिहीन आहे. या समाजाने हजारो वर्षे समाजातील कठीण, अशुद्ध व कष्टाची कामे पार पाडलीडोक्यावर मैला वाहून नेणे, मेलेली जनावरे उचलणे, शेतीची अवजारे तयार करणे, सफाईकामे करणे अशा समाजसेवेच्या माध्यमातून जगणारा हा वर्ग आजही उपेक्षित आहे.

आजही ऊसतोड कामगारांपैकी ९० ते ९५ टक्के कामगार दलित–आदिवासी समाजातील असून त्यांचे आर्थिक शोषण सुरूच असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. एवढेच नव्हे, तर त्यांनी जिथे घरे उभी केली आहेत ती घरे किंवा जमिनी त्यांच्या नावावर होत नाहीत. अनेक ठिकाणी या समाजाला दफनभूमीच उपलब्ध करून दिलेली नाही, अशी खंत यावेळी व्यक्त करण्यात आली.

मराठा आरक्षण आंदोलनातील गुन्हे शासनाने मागे घेतले, त्याच धर्तीवर भीमा कोरेगाव दंगलीनंतर शांततेने निदर्शन करणाऱ्या समाजबांधवांवर दाखल झालेले खोटे गुन्हे मागे घ्यावे. आदिवासी समाज पारंपरिकरित्या मासेमारी करून उपजीविका करत आला आहे. तरीदेखील सरकारी जलाशयातील मासेमारीचे ठेके प्रभावशाली धनदांडग्यांना देण्यात येतात. शासनाने हे ठेके थेट आदिवासी समाजाला दिल्यास त्यांची आर्थिक परिस्थिती उंचावेल, असेही बसपाच्या निवेदनात म्हटले आहे.

शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमाकुल करून भूमिहीनांच्या नावावर करावीत, भूमिहीन कुटुंबांना उपजीविकेसाठी प्रत्येकी मोफत पाच एकर जमीन द्यावी, भीमा कोरेगाव दंगलीनंतर आंदोलनकर्त्यांवर दाखल झालेले खोटे गुन्हे मागे घ्यावेत व सरकारी जलाशयातील मासेमारीचे ठेके आदिवासी समाजाला देण्याची मागणी बसपाच्या वतीने करण्यात आली आहे. या मागण्यांसाठी १३ ऑक्टोबर रोजी मार्केट यार्ड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

अतिरेकी प्रमाणात चहा, कॉफी नको. त्याऐवजी सुप्स, हर्बल टी, डाळ सूप, काढा घ्या. पाणी भरपूर प्या. साधं पाणी प्यायलं जात नसेल तर गरम पाणी प्या. तेल, तुपाचा वापर मर्यादेतच करा. गोड पदार्थांचा अतिरेक नको. ते पदार्थ पचण्यासाठी खूप वेळ आणि कार्यशक्ती खर्च होईल. शरीराचं तापमान कमी होईल.

दही आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे असे फार पूर्वीपासून मानले जात आहे. दह्यात निरोगी बॅक्टेरिया आढळतात जे तुमच्या आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. सकाळी रिकाम्या पोटी दही खाल्ल्याने अनेक शारीरिक आणि मानसिक फायदे मिळतात. दह्यात प्रोबायोटिक्स, प्रथिने, कॅल्शियम आणि इतर पोषक घटक आढळतात. यासोबतच, त्याचे सेवन आरोग्यासाठी चांगले असते कारण ते पचन सुधारणे, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे, हाडे मजबूत करणे आणि त्वचेचे आरोग्य सुधारणे असे अनेक फायदे देते. असे मानले जाते की दह्यामध्ये कॅल्शियम आढळते जे आपल्या हाडांसाठी आवश्यक आहे. जर तुम्हाला तुमची हाडे मजबूत करायची असतील तर तुम्ही दररोज रिकाम्या पोटी दही खाऊ शकता. दह्यामध्ये प्रोबायोटिक्स असतात जे पोटातील चांगले बॅक्टेरिया वाढविण्यास मदत करतात. जर तुम्हाला पचनाच्या समस्या असतील तर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी दही खाऊ शकता. यामुळे बद्धकोष्ठता, अपचन इत्यादींपासून आराम मिळू शकतो.

## पाककला

### अनारसे (साखरेचे)

**साहित्य** – तांदूळ, साखर, तूप, खसखस.

**कृती** – तांदूळ तीन दिवस पाण्यात भिजवून ठेवा. नंतर चाळणीत काढून घ्या व कापडावर वाळत घाला. अगदी ओलसर किंवा खूप जास्त कोरडेही करू नका. नंतर मिक्सरमध्ये बारीक करून घ्या. मैद्याच्या चाळणीने पीठ चाळून घ्या. जेवढे तांदूळ असतील तेवढी पीठी साखर पिठात मिसळवून घ्या. एक वाटी पिठाला दोन चमचे तूप याप्रमाणे तूप घालावे. सर्व पीठ कालवून गोळे करून स्टीलच्या डब्यात भरून ठेवा. ३-४ दिवसांनी अनारशांचे पीठ तयार होते. अनारसे करायच्या वेळी थोडे पीठ ताटात काढून घ्या. त्यात १/४ साईचे दही गालून पीठ मळा. नंतर या पीठाचा पेढ्याएवढा गोळा घेवून खसखशीवर थापून घ्या. नंतर हा अनारसा मंद आचेवर तळून घ्या.

## वास्तू

निळ्या, सोनेरी किंवा पांढऱ्या रंगाची मेणबत्ती घराच्या उत्तर कोपऱ्यात जाळणेही लाभदायक ठरते.

## सल्ला

* मेंदीची पाने बारीक वाटून पोटीस बांधल्यास गाठ बसते व फोडही बरा होतो.

* ज्या जागी जास्त माशा बसतात तेथे ही पावडर ओली करून चोळा माशा बसणार नाहीत.

## सौंदर्य

* ग्लिसरीन, गुलाबपाणी व लिंबाचा रस समप्रमाणात मिसळून चेहऱ्यावर लावल्यास चेहरा उजळतो.

* १ मोठा चमचा टोमॅटोचा रस, १ मोठा चमचा काकडीचा रस, १ मोठा चमचा कोंड्यासकट गव्हाचे पीठ आणि ४-५ थेंब लिंबाचा रस घेऊन कच्च्या दुधात मिसळा. चेहरा, मानेला लावा. २० मिनिटांनंतर धुवून टाका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. २१ सप्टेंबर २०२५

**सर्वपित्री दर्श अमावास्या, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, पूर्वा ०९।३२, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : नवीन कामे, योजना लाभदायक ठरतील. अडकलेली कामे आपल्या प्रयत्नांमुळे पूर्ण होतील. रोख रकमेची मोठी देवघेव टाळा.

**वृषभ** : महत्त्वाच्या कामांमध्ये आपणास घरच्यांचा पाठींबा मिळेल. आपण ठरावीक वेळेत काम पूर्ण कराल. भावनेच्या भरात वाहून नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मिथुन** : अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील. राहते घर व जमिनीसंबंधीच्या कामात स्थिती अनुकूल राहील. मागील उधारी वसुल होईल.

**कर्क** : आपल्या मुक्कामापर्यंत पोहोचण्यासाठी कठोर परिश्रम आणि धैर्याची आवश्यकता आहे.

**सिंह** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. अनुकूल बातम्या कळतील. नोकरदार व्यक्तींसाठी उत्तम काळ आहे. कलाक्षेत्रातील लोकांना अनुकूल परिस्थिती मिळेल.

**कन्या** : पत्नीच्या आरोग्याची चिंता राहील. आपल्या खर्चावर नियंत्रण ठेवा. सामाजिक कार्य काळजीपूर्वक करा. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**तूळ** : आर्थिक खर्च अधिक होईल. कर्ज देणे टाळा. निष्कारण चिंता त्रास देतील. महत्त्वाची कामे यशस्वीरीत्या पूर्ण होतील. शत्रू पराभूत होतील.

**वृश्चिक** : आरोग्याची काळजी घ्या. अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. व्यापार-व्यवसायात सावधगिरी बाळगा.

**धनु** : शेअर्समध्ये गुंतवणुक करु नका. कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील. आरोग्य उत्तम राहील.


**मकर** : अपेक्षित व्यक्तींचे सहकार्य मिळेल. नोकरदारांना अनुकूल वातावरण मिळेल. राजकारणी व्यक्तींना उद्देशात यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

**कुंभ** : महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. शत्रू पराजित होईल. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहाणार नाही. विरोधक नुकसान पोहोचवण्याचा प्रयत्न करतील.

**मीन** : निर्णय घेण्यापूर्वी दोनदा विचार करा. एखाद्या गोष्टीवर डोळे मिटून विश्वास करू नये. आपल्या खाण्या-पिण्याच्या सवयींची काळजी घ्या.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२६७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) संयुक्त महाराष्ट्र निर्मितीत सिंहाचा वाटा उलणाऱ्या या थोर दिवंगत साहित्यिकास 'साहित्य सम्राट' म्हटले जाते ७) लज्जा, लाज, हया ८) माय, आई, जननी ९) एकमेकांवर आदळणे, टक्कर ११) कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात १३) आण्याचा बारावा अंश १५) कपटी, कारस्थानी १८) वाटा, हिस्सा १९) अंत:करण, कलेजा, हृदय २०) निकाल, फडशा, उत्पन्नाचा हिशोब २२) सशक्त, दणकट २३) रीतीला धरुन, पद्धतशीर २४) देव, भगवान

**उभे शब्द :-** १) जागे करणे, शिकविणे २) दहांचा समुदाय ३) गदळ, कचरा ४) विझणे, शांत होणे ५) अगणित, असंख्य, अनंत ६) चार युगांपैकी एक १०) वाघाचे ओरडणे १२) वडिलांचे संबोधन १४) या बसा म्हणणे, आदरसत्कार १६) छिद्र, विवर १७) उत्तर, उलटून बोलणे १८) फेकून मारण्याचे एक हत्यार १९) दक्षिण भारतातील एक प्रसिद्ध नदी २१) कांब, गज २२) बरोबरी, हार, तुलना, माळ

### शब्दगंध क्र. ७२६६ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : अ‍ॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : परिश्रमाने शरीर निरोगी राहते व मन निर्मळ बनते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मन म्हणजे काय?

'मनाचे श्लोक', 'मन चिंती ते वैरी न चिंती', 'आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना', 'मनमानी' असा अनेक ठिकाणी आपण 'मन' या कल्पनेचा वापर करतो. मन म्हणजे काय? हा एक यक्षप्रश्नच आहे. मन हे चंचल आहे. ते वाऱ्यापेक्षा अधिक वेगाने धावते. सर्व भावभावना हा मनाचाच आविष्कार आहे. कोणी मनाने निर्मळ असतो, तर कोणी दुष्ट असतो.

शरीररचनाशास्त्रात मनाचा शोध घ्यायचा प्रयत्न केला, तर ते काही सापडत नाही. हृदय सापडते, मेंदू सापडतो; पण हे मन काही सापडत नाही. खरे पाहायला गेले तर, मन नावाचे कोणतेही इंद्रिय शरीरात नसते. आश्चर्य वाटले ना? नसलेल्या या इंद्रियाविषयी किती म्हणी, वाक्प्रचार सापडतील! शास्त्रज्ञांनी मनाचे शोध लावायचा खूप प्रयत्न केला, पण ते काही सापडले नाही. मेंदूच्या अभ्यासावरून हे लक्षात येते की विचार करण्याची, विश्लेषण करण्याची, कल्पनेचे साम्राज्य निर्माण करण्याची क्षमता मेंदूमध्ये असते. माणसाची बुद्धिमत्ता, त्याचे ज्ञान, त्याला असलेली माहिती, त्याच्या जाणिवा व त्याचे आचारविचार सर्वच मेंदूवर अवलंबून असते. आपण ठरावीक प्रकारे का वागतो, हे आपल्या भोवतालचे वातावरण, आपण काय शिकतो-वाचतो याच्यावर अवलंबून असते. त्यामुळे कोणी निर्मळ मनाचा असेल वा वाईट प्रवृत्तीचा असेल; हे जन्मजात वा आनुवंशिक नसून अनुभव, शिक्षण व भोवतालचे वातावरण यावरच अवलंबून असते. असे हे मन. मेंदूच्या रोगांना यामुळेच मनोविकार, मानसिक रोग अशी नावे दिली जातात.

## कुत्रा आणि चोर

एका गावात एक श्रीमंत माणूस राहत होता. घराच्या राखणीसाठी त्याने एक कुत्राही पाळला होता. त्या कुत्र्याची तो चांगली काळजी घेत असे.

एकदा त्या श्रीमंताचे घर लुटावे म्हणून एक चोर रात्रीचा दबकत-दबकत चोरपावलांनी तेथे आला. तेव्हा कुत्रा त्याच्या अंगावर भुंकू लागला. कुत्र्याने गप्प राहावे म्हणून त्या चोराने त्याच्या पुढ्यात भाकरीचा एक तुकडा टाकला.

भाकरीचा तुकडा न खाता कुत्रा त्या चोराला म्हणाला,

''अरे, इतक्या अपरात्री तू येथे चोरपावलांनी आलास, त्याचवेळी वाईट हेतूने तू तेथे आला असावास, असा मला संशय आला. आणि ज्या अर्थी माझे तोंड गप्प करण्यासाठी माझ्यापुढे तू भाकरीचा तुकडा टाकलास, त्या अर्थी तुझा हेतू चांगला नाही, हे मला पक्के समजले. माझा मालक मला भरपूर खायला-प्यायला देतो. त्यावर मी समाधानी आहे. रात्रीच्या वेळी घराचे रक्षण करण्यासाठीच मी येथे बसतो. घराची राखण करणे, हे तर माझे प्रथम कर्तव्य. मला भाकरीच्या तुकड्याची लाच देऊन तू माझे तोंड बंद करू शकशील, हा तुझा भ्रम आहे. मी कदापि इमान सोडणार नाही. जोपर्यंत तू घराच्या आसपास घुटमळत राहशील, तोपर्यंत मी असाच भुंकत राहून माझ्या मालकाला जागे करण्याचा प्रयत्न करीन. काय समजलास? आत गप गुमान येथून पळ काढ; नाहीतर फुकट जिवाला मुकशील.'' हे ऐकून चोराने तेथून पलायन केले.

तात्पर्य : भ्रष्ट आणि स्वार्थी लोक आपले काम करून घेण्यासाठी आड येणाऱ्या लोकांना लाच देऊन वश करण्याचा प्रयत्न करतात. पण जे खरे प्रामाणिक असतात, ते अशा प्रलोभनाला बळी पडत नाहीत.

## जीवन का अमृत (भाग १)



### गुरू और परमात्मा

जो ज्ञान हम इस दुनिया का इकट्ठा करते हैं, वे उसकी बात नहीं कर रहे हैं; यह अपरा-विद्या है। स्वामी जी महाराज हमें यही समझा रहे हैं कि हमें शब्द के साथ जुड़ना है, प्रभु के नाम के साथ जुड़ना है। प्रभु को पाने का रास्ता बुद्धि और विचारों का रास्ता नहीं है। यह रास्ता कैसे पाया जा सकता है, नाम के साथ हम कैसे जुड़ सकते हैं, यही यहाँ स्वामी जी महाराज समझा रहे हैं : जब तक हम किसी ऐसे गुरु की शरण में नहीं जायेंगे, जो नाम के साथ जुड़ा हो, जो प्रभु के हुक्म से हमें नाम के साथ जोड़ सकता हो, तब तक हम इस दुनिया की दलदल में फँसे रहेंगे। जब आदमी दलदल में फँसा होता है, तो वह दलदल में नीचे की ओर जाता रहता है। जब वह दलदल में फँसता चला जाता है, तो वह हाथ-पैर मारता है,

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

**७) मूंग, उडद की फसल** – जमीन को शक्तिशाली बनाने के लिए (इसके लिए ज्वारी जमीन को शक्तिशाली बनाने का ही फार्मुला प्रयोग करें।)

**मिक्स फसल** – मूंग या उडद की चार लाइन के बाद एक लाइन मकई की या ज्वारी की मिक्स करना आवश्यक है।

**मिक्स फसल** – मूंग या उडद की चार लाइन के बाद एक लाइन मकई की या ज्वारी की मिक्स करना आवश्यक है ।

**बीज संस्कार** – २० किलो बीज को बीजामृत से भिगो दें और ऊपर से रायझोबियम जीवाणु संवर्धक और पी.एस.बी. जीवाणु संवर्धक प्रति २५० ग्राम का तेल चढ़ाकर बीज को छांव में सूखने दें । आठ-दस घंटे के अंदर जमीन गीली हो तब बीज बुवाई करें ।

**फसल संरक्षण** – सभी प्रकार की कीट और इल्लियों के नियंत्रण के लिए ४% गोमूत्र, ५% नीम अर्क या दशपर्णी अर्क में से कोई एक छिडकाएँ ।

**८) चने की फसल** –

जमीन को शक्तिशाली बनाने के लिए

१. प्रति एकड ६ टन गोबर की खाद जमीन में मिलाकर बीज बुवाई के लिए जमीन तैयार करें ।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

दिवसेंदिवस चहाचे दुकानात चहाचे कप इतके
बारीक होत चाललेत की समजत नाहीये,
चहा पितो आहे की 'पोलिओ'चा डोस

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणत्या देशाने भारताच्या सहकार्याने जाफना कोलंबो लक्झरी ट्रेन सुरु केली? – श्रीलंका

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'शेवटची मैत्रीण...'

प्रिय आज्जी, आज आत्ता ह्याक्षणी मी, तुझ्यापासून पाचशे किलोमीटरवर आहे. खरं तर व्हिडिओ कॉलवरुन मी, तुझ्याशी लगेच बोलु शकते पण आज, मला मनापासून वाटलं तुला पत्र लिहावं. खरं तर माझ्या आईच्या जाण्यानंतर तुच माझी आई झालीस. मुलीचं कसं वागावं, कसं राहावं हे मला तू शिकवलंच पण मुलीनं स्वतःच्या पायांवर ऊभं राहावंच हेसुध्दा तुच मला बारंवार सांगितलंस, तसं मला घडवलं, वाढवलं, जपलंस. तू निरक्षर. अक्षरांची अन् तुझी ओळख झालीच नाही पण तरीसुध्दा तू मला शिकवलंस, माझ्या पायांवर उभं केलंस. एकदा तू म्हणाली होतीस,

'पोरी, मप्ल्याला मनापास्नं वाटत व्हतं शिकावं पण बापाजवळ कायमची गरिबीच व्हती. न्हाई शिकिवलं त्यानं. मप्ल्या पोरीला म्या शिकिवलं पण अपघातात पोर्गी गेली.' आज्ञे, अगं आईची आठवण येतीय आज. सकाळपासून तू आणि आईच माझ्या डोळ्यासमोर आहेत. तुम्ही दोघींच्या आठवणींनी मी मनसोक्त रडलेय. स्वतःच्या पायांवर उभी राहिलेली मी पाहण्यासाठी, आई पाहिजे होती. पण... तू माझी आईच आहेस. मी चुकले की तू शिक्षा करायचीस. त्यावेळी मला तुझा राग यायचा. पण आज लक्षात येतंय तू अगदी बरोबर वागलीस माझ्याशी. चुकीची शिक्षा मिळाली तरच मी सुधारणार हे तू ओळखलं होतस. त्यावेळी मी तुझ्याशी अबोला धरायचे, तुझ्यावर रागवायचे, चिडायचे, एकदा तुला माघारी बोलले होते. आज्ञी, तू शिकायला हवं होतंस हेच आज वाटतंय. कारण तू माझ्यासारख्या अनेक मुली घडवल्या असत्या, स्वतःच्या पायांवर उभ्या केल्या असत्या. एकदा मी तुला विचारलं होतं.

'तू शिकली नाहीस तरी तुझं डोकं एवढं चांगलं कसं चालतं ?' तेव्हा तू म्हणाली होतीस 'कोण, कंच्यायळी, कसं बोलतं, वागतं. हे समदं म्या बघते. मंग त्याच्यावर म्या इचार करते. इचार केल्यावर समजतं म्या कसं वागल्या, बोलाया पायजेन.' तु पुस्तकं नाही वाचलीस पण माणसं वाचुन – वाचुन ती वेचलीस. जेव्हा, मी विचार करते, तू मला शिकवलं नसतंस तर आज मी कुठं असते ? एक साधसं घर डोळ्यांसमोर दिसतं. शिकलेली अनेक माणसं, चुकली आहेत हे मी पाहिलंय. पण तू कधीच चुकली नाहीस ह्याचं मला आश्चर्य वाटतं. तू प्रत्येकाच्या वागण्या, बोलण्याचंच नाहीस तर चालण्याचंही निरिक्षण करायचीस. एकदा तू म्हणाली होतीस 'सोताच्या पायानी माणूस कुठं जातोया हे जोपर्यंत त्या मान्साला समजत न्हाई तवर कायबी खरं न्हाई.' आज्ञी, हे तुझं वाक्य मी शतपावली करते तेव्हा कधी कधी आठवतं. मी कित्येकदा म्हणालेय तुला, माझ्याकडं राहायला ये कायमची. पण तू नाही आलीस.

एवढच म्हणतेस, 'पोरी, नवऱ्याला जीव लाव. लेकराला चांगलं शिकिव.' आज्ञे, निदान आठ दिवस तरी माझ्या घरात राहाना. मला, तुझ्या कुशीत झोपावसं वाटतं. मला, तुझी सेवा करण्याची संधी दे. हे पत्र तू कुणाकडून तरी वाचुन घेशील. मला नेमकं काय म्हणायचं आहे हे तुला समजलं असेल. नात, ही आज्ञीची शेवटची मैत्रीण असते असं म्हणतात. मग ह्या मैत्रिणीचं ऐकशील का ? माझं खूप केलस तू. आता तुझी सेवा करण्याची संधी दे. इथं आलीस की मी तुला माझ्या ऑफिसमध्ये घेऊन जाईन, माझ्या खुर्चीवर तुला बसवणार आहे. माझ्या लहानपणी तू मला गोष्ट सांगायचीस. आता मी तुला आठ गोष्टी सांगणार आहे. तुला आवडणारे गुलाबजामुन माझ्या हाताने तुला खाऊ घालणार आहे. आज्ञे, आता नाही म्हणू नकोस. मी तुला हात जोडुन विनंती करते. तुला आणायला गाडी पाठवते. रहा माझ्या घरी आठ दिवस.

माझ्या आईची सेवा करण्याचं भाग्य मला लाभु दे. आता तू थकलीस. खरं तर ह्याच क्षणी आईची सेवा करायची असते. फक्त एकदाच माझी ही विनंती मान्य कर. आई, येना माझ्या घरी. ताठ मानेनं चालणारी तू आता काठी टेकवत चालतेस. ती काठी उचलुन देण्याचं भाग्य तू मला मिळु दे. तुझ्या जीवनातल्या ह्या शेवटच्या मैत्रिणीची विनंती समज हवं तर. मी खूप भाग्यवान समजते स्वतःला कारण तू माझी आज्ञी आहेस. तुझ्या पणतुला तुझ्या ममत्वाची ऊब मिळु दे. त्याला, तुझं जगणं सांगना. खरं तर तुला भेटण्यासाठी तुझा जावईसुध्दा आतुर झाला आहे. फोन करुन होकार कळवशील हिच एकमेव अपेक्षा शेवटच्या मैत्रिणीची. आई, काळजी घे. तुझीच – सायली.

(लेख क्र.५६७)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदीय बालसंस्कार

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**ब) मानसिक ताण** : नोकरीच्या ठिकाणी तसेच घरांमध्ये निर्माण होणारा मानसिक ताण, पती-पत्नीमधील वाद, घरातील इतर सदस्यांबरोबर वाद यांमुळे शरीरातील हार्मोन्सच्या प्रमाणात असंतुलन निर्माण होते. त्यामुळे अति रक्तस्राव होतो. हे टाळण्याकरिता घरातील वातावरण नेहमी प्रसन्न ठेवावे.

**क) संततिप्रतिबंधक साधने** : गर्भाशयात तांबी (कॉपर-टी) बसवली असेल, तर पहिले दोन-तीन महिने रक्तस्राव जास्त प्रमाणात होतो. कारण गर्भाशयाला तांबी स्वीकारण्यास काही कालावधी लागतो. बऱ्याच स्त्रियांमध्ये येणारा हा अति रक्तस्रावाचा त्रास हळूहळू कमी होतो. परंतु काहींमध्ये हा त्रास चालूच राहतो. अशा वेळी तांबी काढावी लागते.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# सर्व प्रकारच्या इमारतींसाठी अग्निसुरक्षा (FIRE SAFETY)

**आग ही कोणत्याही ठिकाणी लागल्यास मोठे नुकसान करते –** जीवितहानी, मालमत्ता हानी तसेच व्यवसाय व समाजाचे दैनंदिन जीवन विस्कळीत करते. छोटासा निष्काळजीपणा मोठ्या दुर्घटनेत बदलू शकतो. म्हणूनच प्रत्येक प्रकारच्या इमारतींमध्ये आग सुरक्षितता (fire safety) अत्यावश्यक आहे.












**१. सर्वसाधारण आग लागण्याची कारणे :**

विद्युत बिघाड (शॉर्ट सर्किट, वायरिंगची झीज, ओव्हरलोड)

स्वयंपाकघरातील अपघात (गॅस गळती, चूल/स्टोव्ह निष्काळजीपणे चालू ठेवणे)

हीटर किंवा बॉयलरमधील दोष

ज्वलनशील पदार्थांचा अयोग्य साठा (कागद, कपडे, पेट्रोल, रसायने)

धूम्रपान, अगरबत्ती/दिवा निष्काळजीपणे ठेवणे

सेंट्रल AC किंवा HVAC डक्ट्स संपूर्ण इमारतीला जोडलेले असतात. आग लागल्यास या डक्ट्समधून धूर, कार्बन मोनोऑक्साइड, गरम वायू पटकन सर्व मजल्यांवर पसरतात यामुळे आगीच्या ठिकाणी नसतानाही लोक श्वास गुदमरून मरण पावतात.

**२. इमारतीप्रमाणे अग्निसुरक्षा उपाय :**

✻ निवासी इमारती

✻ प्रत्येक मजल्यावर धूर संवेदक (Smoke Detector) व अग्निशामक सिलिंडर ठेवणे

✻ गॅस पाईप व विद्युत तपासणी नियमित करणे

✻ इमारतीतील जिने व मार्ग नेहमी मोकळे ठेवणे

✻ उंच इमारतीत हायड्रंट, पंप रूम व शरणस्थान (Refuge Area) ठेवणे

✻ रुग्णालये, शाळा व शैक्षणिक संस्था

✻ रुग्ण, मुले व वयोवृद्ध यांना सुरक्षितरीत्या बाहेर काढण्याची योजना जसे की आपत्कालीन जिना (अतिरिक्त)

✻ फायरप्रूफ साहित्य वापरणे

✻ आपत्कालीन प्रकाशव्यवस्था व बॅकअप पॉवर ठेवणे

✻ विद्यार्थ्यांसाठी/रुग्णालय कर्मचाऱ्यांसाठी विशेष फायर ड्रिल

✻ सार्वजनिक इमारती (मंदिरे, नाट्यगृहे, रेल्वे/बस स्थानक, सभागृह)

✻ स्पष्ट दिसणारे आपत्कालीन मार्गदर्शक फलक व प्रकाशव्यवस्था

✻ गर्दी नियोजन व शिस्तबद्ध निर्वासनाची योजना

✻ धूम्रपान व खुल्या ज्वाला यांना सक्त मनाई

✻ मध्यवर्ती फायर अलार्म नियंत्रण यंत्रणा

✻ व्यावसायिक इमारती (कार्यालये, दुकाने, हॉटेल, मॉल)

✻ फायर अलार्म व स्प्रिंकलर प्रणाली बसवणे

✻ सर्व मजल्यावर स्वच्छ चिन्हांकित आपत्कालीन बाहेर पडण्याचे दरवाजे ठेवणे

✻ कर्मचाऱ्यांसाठी नियमित फायर ड्रिल घेणे

✻ फायर वॉर्डन/सुरक्षा अधिकारी नियुक्त करणे

✻ औद्योगिक इमारती (कारखाने, गोदामे, पेट्रोल पम्प ई.)

✻ ज्वलनशील रसायने/इंधन यांचा स्वतंत्र व सुरक्षित साठा

✻ स्फोटरोधक विद्युत उपकरणे

✻ फोम/स्प्रिंकलर सारखी स्वयंचलित अग्निशमन व्यवस्था

✻ कर्मचाऱ्यांना रासायनिक व विद्युत आगीवरील प्रशिक्षण देणे

**३. सर्व इमारतींसाठी आवश्यक सामान्य उपाय:**

✻ फायर अलार्म व डिटेक्शन सिस्टम बसवणे

✻ अग्निशामक उपकरणे (सिलिंडर, हायड्रंट, स्प्रिंकलर) नेहमी कार्यरत ठेवणे

✻ वार्षिक फायर रिस्क ऑडिट/तपासणी करणे

✻ रहिवासी, कर्मचारी व सुरक्षा रक्षकांसाठी फायर ड्रिल घेणे

✻ आपत्कालीन क्रमांक (१०१, रुग्णवाहिका, पोलीस) इमारतीत ठळकपणे लावणे

**४. कायदेशीर आवश्यकता :**

✻ राष्ट्रीय बांधकाम संहिता (NBC) व स्थानिक अग्निशमन नियमांचे पालन

✻ फायर NOC घेणे व नूतनीकरण करणे

✻ विमा संरक्षण (Fire Insurance) घेणे

✻ प्रमाणित तज्ञांकडून नियमित तपासणी

**५. सारांश :**

अग्निसुरक्षा ही एकदाच करायची प्रक्रिया नाही, तर सततची जबाबदारी आहे. निवारण, तयारी आणि त्वरित प्रतिसाद हेच जीव व मालमत्ता वाचवतात.

आग लागल्यावर विझवण्यापेक्षा आग लागण्यापूर्वी खबरदारी घेणे हेच सुरक्षिततेचे खरे तत्त्व आहे.

आम्ही २०१५ पासून Fire Engineering safety management चे काम करत असून अनेक व्यवसायिक, औद्योगिक संस्थाना आमची सेवा देतो.

**– इंजि. अभिजीत नाथा घुले ॲण्ड असोसिएटस्**
**CHARTERED ENGINEER (INDIA),**
**Lender's Engineer, Govt. Registered Valuer,**
**B.E. (CIVIL), MIE, FIV, LL.B., M.Sc.**
**(REAL ESTATE VALUATION),**
**DFE & SM (Diploma in fire engineering safely management)**
**Offices- Mumbai, Thane, Pune, Nasik, Ahilyanagar, Beed.**
**Mobile: 8888994333**
**Email: abhiyanta.ang@gmail.com**



AESA
**Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar**

# सावेडीतील श्री समर्थ प्रशालेत हिंदी दिन उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून सांगितले हिंदीचे महत्व

नगर – श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर माध्यमिक विभागात हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हिंदी दिन कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रेसिडेन्शिअल हायस्कूलचे हिंदी विषयप्रमुख पी. व्ही. ढगे हे होते. शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, संस्थेचे सचिव व प्राथमिक विभाग शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर, माध्य विभागाच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्या श्रीमती संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनिल कानडे आदी उपस्थित होते.



श्री समर्थ विद्या मंदिर माध्यमिक विभागात पी. व्ही. ढगे यांचा सत्कार करताना ॲड. किशोर देशपांडे. (छाया – उदय जोशी)

प्राचार्या संगीता जोशी यांनी प्रास्ताविकात हिंदी भाषेचे देशाच्या जडणघडणीत तसेच विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात अनन्यसाधारण महत्व सांगितले.

विद्यार्थ्यानी हिंदी भाषेचे महत्व मनोरंजकरित्या सांगणारी एक हिंदी नाटीका प्रस्तुत केली हिंदी हिंदी भारत मॉ की बिंदी या गाण्यावर नृत्य प्रदर्शित केले. कु. आकृती असनीकर व कु. अनुष्का आगळे या विद्यार्थिनी हिंदी भाषेचे महत्व सांगितले. विद्यार्थिनींनी कंधो से मिलते है कंधे हे गीत सादर केले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला श्री समर्थांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात ईशस्तवन स्वागत गीताने झाली. कार्यक्रमास श्रीमती नारळे, सौ. बांगर, सौ. योगिता कुलकर्णी, साठे आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन पार्थ जरेने केले. अपूर्वा खंडागळे हिने पाहुण्यांचा परिचय करून दिला. कल्याणी सदावर्ते हिने आभार मानले. कार्यक्रमाचा समारोप हिंदी पसायदानाने करण्यात आला.

पी. व्ही. ढगे यांनी वेगवेगळया भाषेतील व्यक्ती जेव्हा एकमेकांशी बोलतात तेव्हा ते फक्त हिंदी मध्येच अधिक सुलभतेने बोलतात गुरूबिन ज्ञान न उपजे गुरूबिन मिले न मोक्ष गुरूबिन सत्य न उपजे गुरूबिन मिटे ना दोष कबिरा गुरूबिन मिटे ना दोष असे दोहे सांगून हिंदी भाषा व गुरूचे महत्व सांगितले.

# नेपाळ येथील आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्समध्ये नगर येथील डॉ. हृषिकेश पंडित यांचा गौरव



नगर – अहिल्यानगरचे स्त्रीरोगतज्ज्ञ व 3 D लेप्रोस्कोपी शस्त्रक्रियेतील शल्यविशारद डॉ. हृषिकेश पंडित यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले. नेपाळमध्ये ४ ते ६ सप्टेंबर दरम्यान नेपाळ सोसायटी ऑफ गायनेकॉलॉजिक एंडोस्कोपी यांच्या वतीने काठमांडूमध्ये झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय लेप्रोस्कोपी परिषदेत डॉ. पंडित यांना आंतरराष्ट्रीय ऑपरेटिंग फॅकल्टी म्हणून सन्मानपूर्वक निमंत्रित करण्यात आले होते. या परिषदेत युरोप व आशियातील एकूण आठ देशांतील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. डॉ. पंडित यांनी यावेळी अत्यंत जटिल, लेप्रोस्कोपिक व्हजायनोप्लास्टी शस्त्रक्रिया (एम आर के सिंड्रोम) जन्मजात योनीमार्ग (व्हजायना) नसलेल्या पेशंटमध्ये (लाइव्ह सर्जरी) सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ही शस्त्रक्रिया जन्मजात दोष असलेल्या स्त्रियांमध्ये भविष्यातील प्रेग्नंसी साठी उपयोगी ठरते. तसेच लेप्रोस्कोपिक सर्क्लाज या शस्त्रक्रियेतील आपले संशोधनात्मक सादरीकरण करून जगभरातील तज्ज्ञांकडून प्रतिसाद मिळवला.



पेमराज सारडा महाविद्यालयात नमो वक्तृत्व स्पर्धेत बोलताना ॲड. अभय आगरकर आदी.

# वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित होतात

## ॲड. अभय आगरकर यांचे प्रतिपादन

नगर – महविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित होण्यास मदत होते. खर तर महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धेत सातत्याने भाग घेतला पाहिजे. भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलाने तुम्हाला अशी संधी उपलब्ध करून दिली आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो, असे प्रतिपादन ॲड. अभय आगरकर यांनी केले.

ते पेमराज सारडा महाविद्यालयात नमो वक्तृत्व स्पर्धेत बोलत होते. यावेळी प्राचार्या माहेश्वरी गावित, उपप्राचार्य गिरीश पाखरे, प्रा. अविनाश झरेकर, सावेडी मंडलाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे, सरचिटणीस निखिल वारे, मध्य मंडलाचे अध्यक्ष मयूर बोचुघोळ, महिला मोर्चा अध्यक्षा रेणुका करंदीकर, प्रियाताई जानवे उपस्थित होते.

यावेळी प्रतिक्षा रसाळ, प्रज्ञा जोशी, सोनाली पाठक, साहिल शेख, ज्ञानेश्वर काळे, पंडित वाघमारे, अभिजीत बोरुडे, महेश लोंढे आदी उपस्थित होते. परीक्षक म्हणून प्रा. प्रसाद बेडेकर व प्रा. शशिकांत शिंदे यांनी काम पाहिले. स्पर्धेचे सूत्रसंचालन हेमंत पवार यांनी केले. अनिरुद्ध घैसास यांनी आभार मानले.

# सेवानिवृत्त एसटी कर्मचारी संघटना अहिल्यानगर शाखेचा गौरव

## मयत कर्मचाऱ्यांच्या पत्नी व सेवानिवृत्तांना एसटीचा मोफत पास; संघटनेच्या कार्यकर्त्यांचा संभाजीनगर येथे सन्मान



सेवानिवृत्त एसटी कर्मचारी संघटना अहिल्यानगर शाखेच्यावतीने राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – सेवानिवृत्त एसटी कर्मचारी संघटना अहिल्यानगर शाखेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने मयत झालेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पत्नींना व सेवानिवृत्तांना वर्षभरासाठी मोफत एसटीचा पास मिळाला आहे. या उल्लेखनीय कार्याबरोबरच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सक्रियपणे काम करणाऱ्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा छत्रपती संभाजीनगर येथे विशेष सन्मान करण्यात आला. अहिल्यानगर शाखेने केलेल्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमात अहिल्यानगर शाखेचे कार्याध्यक्ष अर्जुनराव बकरे, केंद्रीय सदस्य बलभीम कुबडे, जिल्हा सचिव गोरख बेळगे, जिल्हाध्यक्ष गंगाधर कोतकर, खजिनदार विठलराव देवकर, तसेच राजेंद्र माने, अशोक क्षीरसागर, एकनाथ औटी, एस.एस. शेख (सोनई) आदींचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी राज्य सचिव सदानंद विचारे, राज्य कार्याध्यक्ष श्रीराम गालेवाड, राज्य कोषाध्यक्ष गणेश वायफळकर यांच्यासह संभाजीनगर प्रादेशिक विभागाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांचा सत्कार अहिल्यानगर शाखेच्या वतीने करण्यात आला.

कोपरगाव आगारातून सेवानिवृत्त झालेले माजी सहाय्यक वाहतूक निरीक्षक उदय रोकडे यांची सातारा जिल्ह्यातील श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जन गड येथे गडाचे व्यवस्थापकपदी निवड झाल्यामुळे त्यांचाही सज्जनगड येथे जावून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला राजेंद्र माने, भांड तात्या, सुनिल घालमे, काशिनाथ लाखे, बाळासाहेब गलांडे, बाळासाहेब काळे, एकनाथ औटी, लाखे, कुबडे, कोतकर, देवकर आदी उपस्थित होते.

बलभीम कुबडे म्हणाले की, सेवानिवृत्त कर्मचारी हे आपल्या कार्यकाळात आयुष्यभर शासन व जनतेसाठी समर्पित राहतात. मात्र निवृत्तीनंतर त्यांच्या हक्काच्या सुविधा व सवलती मिळवून देण्यासाठी संघटनेला सातत्याने संघर्ष करावा लागतो. अहिल्यानगर शाखेच्या पुढाकारामुळे मयत कर्मचाऱ्यांच्या पत्नींना वर्षभर मोफत पास मिळणे ही अतिशय दिलासादायक बाब आहे. संघटनेचे अर्जुनराव बकरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य सुरु आहे. ही केवळ एक सुरुवात असून, भविष्यात आरोग्य सुविधा, पेन्शनमधील अडचणी, प्रवास सवलती, तसेच इतर प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी संघटना प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले.

# रोटरीचा स्टडी ॲप वंचित समूहातील दहावीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी उपयुक्त

## डॉ. सुरेश पठारे यांचे प्रतिपादन



सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, रोटरी क्लब ठाणे, रोटरी ई–क्लब ऑफ एम्पॉवरिंग युथ अहिल्यानगर तसेच आयआरडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने एसएससी स्टडी ॲपचे अनावरण व वितरण सोहळा सीएसआरडी महाविद्यालयात पार पडला.

नगर – वंचित समूहातील विद्यार्थ्यांसाठी रोटरीचा एसएससी स्टडी ॲप शिक्षणाचा नवा आधार असून या द्वारे डिजिटल शिक्षणाच्या आधारे गुणवत्ता वाढविण्याची विद्यार्थ्यांना संधी आहे. या ॲपचा जास्तीत जास्त उपयोग विद्यार्थ्यांनी करून परीक्षेत चांगले गुण मिळवून यश संपादन करणे गरजेचे आहे. शिक्षण हेच खऱ्या अर्थाने विकासाचे साधन असून, या डिजिटल माध्यमातून विद्यार्थ्यांना नवे क्षितिज खुलं होणार असल्याचे सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी सांगितले.

सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, रोटरी क्लब ठाणे, रोटरी ई–क्लब ऑफ एम्पॉवरिंग युथ अहिल्यानगर तसेच आयआरडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने एसएससी स्टडी ॲपचे अनावरण आणि वितरण सोहळा सीएसआरडी महाविद्यालयात पार पडला. या उपक्रमाअंतर्गत या एसएससी स्टडी ॲपच्या कुपनचे वितरण करण्यात आले तसेच त्याबाबत सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी अहिल्यानगर शहर व जिल्हा तसेच राज्यातील विविध शाळेचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. रोटरी क्लब ठाणे यांच्या वतीने हे ॲप विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास तयार करण्यात आलेल्या या ॲपमध्ये संपूर्ण अभ्यासक्रम डीजीटल स्वरूपात असून यामध्ये मार्गदर्शक व्हिडिओ, प्रश्नपत्रिका तसेच महत्वाचे प्रश्न उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अभ्यास करू शकतील. ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी हे ॲप एक महत्त्वाचे शैक्षणिक साधन ठरणार आहे. असल्याचे मत प्रकल्प प्रमुख डॉ. बिंदू शिरसाठ यांनी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमास सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, रोटरी क्लब ऑफ ठाणेचे युथ सर्व्हिस डायरेक्टर संतोष आंबेकर, प्रकल्प प्रमुख श्रावणी आंबेकर, कमिटी सदस्य रेहाना शेख, अल्ताफ शेख तसेच अहिल्यानगर रोटरी ई–क्लब ऑफ एम्पॉवरिंग युथच्या अध्यक्षा संगीता चंद्रन आणि प्रकल्प प्रमुख डॉ. बिंदू शिरसाठ उपस्थित होते. यावेळी संतोष आंबेकर यांनी या ॲपच्या वापराबाबत सविस्तर माहिती दिली.

सूत्रसंचालन सॅम्युअल वाघमारे यांनी केले. संगीता चंद्रन यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सीएसआरडी महाविद्यालयाचे कर्मचारी व विदयार्थी यांनी परिश्रम घेतले.



श्रमिक कल्याण कामगार संघटनेच्या महिला जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याचे नियुक्ती पत्र आशा आमले यांना प्रदान करताना सुनील ठाकरे आदी.

# श्रमिक कल्याण कामगार संघटनेच्या महिला जिल्हा अध्यक्षपदी आशा आमले यांची निवड

नगर – अहिल्यानगर तालुक्यातील जेऊर येथील सौ. आशा वसंत आमले यांची श्रमिक कल्याण कामगार संघटना महाराष्ट्र राज्याच्या महिला जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तानाजी शिंदे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी भिल्ल असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील ठाकरे, राम शिंदे, अविनाश लाहोर, भरत धुरपते, किशोर भिंगारे, श्रीकांत सुरम आदी उपस्थित होते.

यावेळी प्रदेशाध्यक्ष तानाजी शिंदे म्हणाले की, संघटनेमध्ये महिलांचा सहभाग हा नेहमीच महत्त्वाचा राहिला आहे. आशा आमले यांच्या समाजसेवेतील कार्याचा व सामाजिक भानाचा विचार करून त्यांना ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे महिलांना संघटनेत मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळेल, तसेच कामगारांच्या प्रश्नांबरोबरच महिला सक्षमीकरणाच्या उपक्रमांना नवी दिशा मिळेल. आशा आमले यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील महिला कामगार चळवळीला बळकटी येईल, असा विश्वास आहे.

सौ. आशा आमले म्हणाले की, माझ्यावर संघटनेने दाखविलेला विश्वासाला तडा न जाऊ देता मी या पदाच्या माध्यमातून महिलांच्या समस्या, त्यांचे हक्क व कल्याण यासाठी कटिबद्ध राहीन. कामगार बांधवांच्या अडचणी सोडविण्यासाठी आणि संघटनेचे बळ वाढविण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करेन. समाजहिताच्या कार्याला नेहमीच प्राधान्य देऊन संघटनेच्या कार्यात महिलांचा सक्रिय सहभाग वाढविण्याचा माझा संकल्प असणार असल्याची भावना व्यक्त केली.

# भिंगार सरपंच गल्ली येथे नवरात्र उत्सवानिमित्त कलगीतुराचा कार्यक्रम

नगर – नवरात्र उत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भिंगार सरपंच गल्ली येथे तिसऱ्या माळेला कलगीतुराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

२४ सप्टेंबर रोजी रात्री ८.३० वाजता हा कार्यक्रम रंगणार आहे.या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध भागांतील शाहिरांची उपस्थिती लाभणार असून रसिक प्रेक्षकांसाठी हा सांस्कृतिक मेजवानीचा सोहळा ठरणार आहे.

महाराष्ट्रातील सर्व शाहिरांनी तसेच रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भिंगार कलगीतुरा मंडळाचे अध्यक्ष भाऊ कर्डिले यांनी केले आहे.

# जिल्ह्यात २ ऑक्टोबरपर्यंत 'नमो नेत्र संजीवनी अभियान'; मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व चष्म्यांचे होणार वाटप

नगर - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत अहिल्यानगर जिल्ह्यात 'नमो नेत्र संजीवनी अभियान' राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील आदिवासी, भटक्या जमातींच्या वस्त्या, दलित वस्त्या, जनजाती क्षेत्रे तसेच दुर्बल घटकांच्या वस्त्यांमध्ये हे अभियान राबविण्यात येणार असून, यामध्ये नागरिकांची नेत्ररोगासंदर्भात मोफत तपासणी, शस्त्रक्रिया व चष्म्यांचे वाटप करण्यात येणार आहे. हे अभियान मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक अजय काळे यांनी दिली.

हे अभियान जिल्हा सामान्य रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच विविध विभाग, सेवाभावी संस्था, धर्मादाय रूग्णालय व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राबविणाऱ्या रुग्णालयांच्या सहयोगाने आयोजित केले जाणार आहे. नेत्र शिबिरांकरिता वैद्यकीय अधिकारी, पॅरा-वैद्यकीय कर्मचारी, निदानात्मक साधने, उपचारात्मक संसाधने आणि आवश्यक औषधांची सुयोग्य उपलब्धता सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

'नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियान' अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिकांची नेत्र तपासणी, उपचार व मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. नागरिकांच्या नेत्र आरोग्याविषयी जागरूकता वाढवून त्यांना मोफत सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हे अभियान जिल्हाभर राबविले जाणार आहे.

या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी शिबिरात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, यांच्यासह आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर नंदकुमार नेहरकर, जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉक्टर संतोष रासकर, नेत्र चिकित्सा अधिकारी डॉ. संतोष चौधरी यांनी केले.

या अभियानाचे उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांच्या नेत्रविकारांचे निदान करून त्यांना मोफत उपचार उपलब्ध करून देणे होय. यामध्ये विशेषत: मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच अन्य नेत्रविकारांवरील तपासण्या व उपचार नेत्रविशेषज्ञांच्या मदतीने करण्यात येणार आहेत. जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ही शिबिरे आयोजित केली जातील.

जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालये या अभियानात सहभागी होणार असून आरोग्य यंत्रणा सज्ज आहेत. यामुळे नागरिकांना नेत्र आरोग्याविषयी अधिक जागरूकता मिळेल, गंभीर आजारांचे लवकर निदान होईल आणि योग्य वेळेत उपचार मिळतील.

या अभियानात प्रत्येक कुटुंबाने आपल्या घरातील सर्व सदस्यांना तपासणीसाठी आणून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने केले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये त्वचा व गुप्तरोगावर प्रभावी उपचार सुविधा

## डॉ.दर्शना चेडे पूर्ण वेळ उपलब्ध



नगर - जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे अद्ययावत उपचार सुविधांनी परिपूर्ण त्वचारोग व गुप्तरोग विभाग कार्यरत आहे. याठिकाणी त्वचा व गुप्तरोग तज्ज्ञ डॉ.दर्शना चेडे पूर्ण वेळ उपलब्ध असून त्वचेशी निगडीत विविध समस्यांवर प्रभावी उपचार केले जातात. डॉ.चेडे यांनी एमबीबीएस नंतर एम.डी. डिएनबी, डर्माटोलॉजी पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे.

हॉस्पिटलमध्ये बुरशी (फंगल इन्फेक्शन), त्वचेचे जिवाणू संसर्ग, व्हायरल, कुष्ठरोग, गुप्तरोगावर उपाचार सुविधा उपलब्ध आहेत. मुरुम व त्याचे डाग, त्वचेवरील लालसरपणा, खाज सुटणे, केस गळणे, केस तुटणे, कमकुवत केस, टक्कल, कोंडा, नखांवर डाग, नखं ठिसूळ होणे, तुटणे, फंगल इन्फेक्शन ऑफ नेल्स यावर उपचार उपलब्ध आहेत. याशिवाय सौंदर्य विषयक त्वचा उजळणे, पिग्मेंटेशन, फ्रेकल्स कमी करणे, त्वचेचे रिजुव्हनेशन, अँटी एजिंग ट्रिटमेंट सुविधा उपलब्ध आहेत.

एक्झिमा, सोरायसिस, लर्जी, हिटिलिगो, त्वचा कर्करोग तपासणी व उपाचार सुविधा विभागात आहेत. लहान मुलांच्या त्वचेवरील उपचार, जन्मजात खुणा, मुलांमध्ये एक्झिमा, लर्जी तपासणी सुविधा आहे. त्वचेशी निगडीत विविध आजारांवर उपचार करतानाच प्रतिबंधात्मक उपाययोजनांबातही मार्गदर्शन केले जाते. ऋतुनुसार त्वेचेची, केसांची काळजी कशी घ्यावी, योग्य स्किन केअर दिनचर्या, सनस्कीन, सूर्यप्रकाशापासून संरक्षण्या, योग्य केस निगा सल्ला मार्गदर्शनही हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहे. रूग्णांनी या दर्जेदार उपचार सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९४०३१ ८६३८७

# अहिल्यानगर येथील शितल झरेकर यांना राज्य शासनाचा शिक्षक पुरस्कार जाहीर

## २२ सप्टेंबर रोजी मुंबईत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरण



नगर - राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने देण्यात येणारा २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार अहिल्यानगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भालगाव (ता.नेवासा) येथील तंत्रस्नेही उपक्रमशील शिक्षिका शितल झरेकर-आठरे यांना जाहीर झाला आहे.

राज्यातील शाळांमध्ये उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या १०९ शिक्षकांना २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांतील क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षण गुणगौरव पुरस्कार नुकतेच जाहीर झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विविध प्रयोगाद्वारे शिक्षण देणाऱ्या कृतिशील शिक्षिका शितल झरेकर यांच्या नोकरीची सुरवात जिल्हा परिषद शाळा प्रवरासंगम येथे झाली. यानंतर भालगाव शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देणाऱ्या तंत्रस्नेही शिक्षिका त्यांचे कार्य राज्यासाठी दिशादर्शक ठरत आहे.


मिशन आपुलकी अंतर्गत भालगाव शाळेत लोकसहभागाद्वारे त्यांनी डिजिटल स्मार्ट क्लास नाविन्यपूर्ण तयार केला आहे. एनसीईआरटी च्या. एक भारत श्रेष्ठ भारत या उपक्रमांतर्गत शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती, पीएमई विद्या चॅनलवर शैक्षणिक आशय प्रक्षेपणासाठी ई साहित्य निर्मिती, दीक्षा ॲप समृद्धीसाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. बालभारतीच्या आभासी वर्ग, एससीइआरटीच्या 'शिकू आनंदे' उपक्रमात सुलभक म्हणून राज्यातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. तर बालभारती आयोजित एकात्मिक पाठयपुस्ताक समीक्षण आणि निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत शिक्षक मार्गदर्शक कृतिपुस्तिका निर्मितीत सहभाग नोंदवला आहे. आनंददायी शनिवार अंतर्गत घेतलेले दोन्ही शाळेचे उपक्रम समग्र शिक्षा मुंबईच्या सोशल हॅण्डललवर झळकले असून आज अखेर त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत शासन पुरस्कृत संस्थांकडून राष्ट्रीय, राज्य व जिल्हा स्तरावर विविध पुरस्कारांनी, फेलोशिपने सन्माानित केले आहे.

राज्यातील शिक्षकांना दिशादर्शक जॉयफुल लर्निंग व आर्ट इंटिग्रेटेड लर्निंग पद्धतीचे स्व्तःच्या यु टयूब चॅनलवर आजअखेर स्वनिर्मित ३७२ शैक्षणिक व्हिडिओ प्रसारित केले आहेत. आज अखेर त्यांचे विविध विद्यार्थी राष्ट्री य व राज्यरस्तेरीय शैक्षणिक स्पर्धा, उपक्रमात विद्यार्यां चे उल्लेखनीय यश संपादित केले आहे.

घटस्थापनेच्या मुहूर्तावर २२ सप्टेंबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईत हा पुरस्कार प्रदान सोहळा पार पडणार आहे. एक लाख रुपये, स्मृतीचिन्ह व शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शितल झरेकर या नगर तालुक्यातील घोसपुरी गावच्या कन्या आहेत.

# नगरमध्ये स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट साहित्य संमेलनाची मैफल

## संयोजनासाठी २१ सप्टेंबर रोजी साहित्यिक-वाचकांची बैठक



नगर - महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या समन्वयाने स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट यांच्या लेखन-विचारांना उजाळा देणाऱ्या साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाणार आहे. जिल्हास्तरीय साहित्य संमेलन योजनेतून निंबळक (ता. अहिल्यानगर) येथील आत्मनिर्धार फाऊंडेशन संस्थेतर्फे नगर शहरात नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिन्यात याचे आयोजन करण्यात येईल, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना अध्यक्ष गवळी म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने जिल्हावार संमेलनासाठी प्रस्ताव मागणी केली होती. प्राप्त प्रस्तावांपैकी मंडळाच्या सदस्यांनी बहुमताने आत्मनिर्धार फाऊंडेशन या संस्थेच्या नाविन्यपूर्ण प्रस्तावाला मान्यता दिली. संस्थेने संमेलनाला 'स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट' यांचे नाव दिले आहे. सेनापती बापट यांच्या लेखन आणि विचारांना यानिमित्ताने पुन्हा एकदा उजाळा देण्याचा प्रयत्न आहे. नुकतेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने संस्थेला याबद्दलचे मंजुरी पत्र आणि मार्गदर्शक सूचनांची यादीही पाठवली आहे. सदर सूचनांचे पालन करत साहित्य संमेलन यशस्वी केले जाणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील साहित्यिक आणि वाचक यांचीही मदत घेतली जाणार आहे.

### भूमिपुत्राच्या विचारांची नव्याने ओळख व्हावी

१९८० मध्ये पांडुरंग महादेव बापट यांचा जन्म पारनेर येथे झाला. पुढे त्यांनी पुणे आणि अगदी परदेशात लंडन येथे जाऊन शिक्षण घेतले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी आपल्या कार्याचा अमीट ठसा उमटवला. मुळशी धरणग्रस्तांच्या पाठीशी उभा राहून त्यांनी लढा दिल्याने त्यांना सेनापती ही उपाधी जनतेने बहाल केली. काँग्रेस पक्षासह त्यांनी विविध संघटनांमध्ये काम केले. क्रांतिकारी चळवळीत कार्य करताना त्यावेळी त्यांनी रशियन क्रांतिकारकांच्या मदतीने बॉम्ब बनवण्याचे प्रशिक्षण घेतले होते. त्याचा प्रोटोटाईप त्यांनी पुढे युरोपातून भारतात पाठवला. त्यामुळे क्रांतीकारी चळवळीला यातून मोठी मदत झाली. त्यामुळे त्यांच्या लेखन-विचारांना पुन्हा उजाळा मिळावा असा संमेलनाच उद्देश आहे. सेनापती हे नगर जिल्ह्याचे भूमिपुत्र आहेत. त्यांनी संपूर्ण भारतभर भ्रमंती करून स्वातंत्र्य चळवळींमध्ये महत्वाचे योगदान दिले आहे. नव्या पिढीला त्यांच्याबद्दल माहिती व्हावी यासाठी त्यांच्या नावाने साहित्य संमेलन घेतले जाणार आहे, अशी माहिती गवळी यांनी दिली.

संमेलन नियोजनाची पहिली बैठक १४ नोव्हेंबर रोजी पार पडली. यावेळी प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे, प्रा. डॉ. महेबुब सय्यद, लेखक सचिन मोहन चोभे, ह.भ.प. सिद्धिनाथ मेटे महाराज उपस्थित होते. तर, ज्येष्ठ साहित्यिक रामदास कोतकर यांनी संमेलन यशस्वी करण्यासाठीचा निर्धार यावेळी व्यक्त केला. कवी ॲड. राहुल ठाणगे, बलभीम निमसे, नामदेव लोंढे यांनीही ऑनलाईन पद्धतीने बैठकीत सहभागी होऊन मार्गदर्शक सूचना केल्या.

### जिल्ह्यातील साहित्यिक-वाचकांनी संयोजनासाठी मदत करावी

महाराष्ट्र शासनाने जिल्ह्यातील स्थानिक साहित्यिकांना प्रतिनिधित्व मिळावे. वाचकांना आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी आणि साहित्यिक चळवळीत त्यांचा सहभाग वाढवा या हेतूने जिल्हावार संमेलने घेण्याचे ठरविले आहे. अभिजात मराठी भाषेसाठी असे कार्यक्रम महत्वाचे आहेत. त्यानुसार आत्मनिर्धार फाऊंडेशन हे नगर जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी, रसिक वाचक, प्रकाशक, शिक्षक, व्यावसायिक, उद्योजक, विद्यार्थी, शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था व कोचिंग क्लासेस अशा सर्वांनाच संयोजनासाठी मदत करण्याचे आवाहन करत आहे. संयोजन समिती ही सर्वांसाठी खुली असेल. त्यामुळे यासाठी इच्छुकांनी ॲड. राहुल ठाणगे (मो. ७०४०१४४३४१) व रामदास कोतकर (मो. ९८९०९९७६८४) यांच्याकडे संपर्क साधावा. २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता नगर शहरातील बालिकाश्रम रोडवरील अमोल सायंबर संचलित मास्टरमाईंड करिअर ॲकॅडमी येथे याबद्दलची पहिली बैठक होईल. या बैठकीसाठी साहित्य रसिकांनी उपस्थित राहून संमेलन यशस्वितेसाठी सूचना कराव्यात, असे आवाहन ह.भ.प. मेटे महाराज यांनी केले आहे.

# जागतिक स्वच्छता दिन

## २० सप्टेंबर : समाजपरिवर्तनाचा शाश्वत मार्ग

मानव समाजाचा विकास केवळ तांत्रिक प्रगतीवर, औद्योगिक उन्नतीवर किंवा भौतिक सुखसुविधांच्या उपलब्धतेवर होत नाही, तर त्यामागे एक महत्त्वाचा पाया असतो आणि तो म्हणजे स्वच्छता होय. स्वच्छतेशिवाय आरोग्य, आरोग्याशिवाय श्रमशक्ती, श्रमशक्तीशिवाय उत्पादन आणि उत्पादनाशिवाय समाजाची प्रगती अशक्य आहे. म्हणूनच इतिहासापासून आधुनिक काळापर्यंत जगातील सर्व समाजांमध्ये स्वच्छतेला सामाजिक मूल्य, नैतिक कर्तव्य आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग मानले गेले आहे. मात्र विसाव्या शतकानंतर झालेल्या औद्योगिकीकरणाने, वेगवान शहरीकरणाने आणि उपभोक्तावादी संस्कृतीने जगासमोर कचऱ्याचे व्यवस्थापन, पाण्याचे प्रदूषण, वायुप्रदूषण आणि जमिनीची धोकादायक नासाडी असे प्रश्न उभे केले आहेत. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र महासभेने दि. ८ डिसेंबर २०२३ रोजी ठराव क्र.A/RES/78/122 मंजूर करून दरवर्षी २० सप्टेंबर हा जागतिक स्वच्छता दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला.

जागतिक स्वच्छता दिन हा दिवस फक्त कचरा गोळा करण्याचा दिवस नाही, तर तो समाजातील प्रत्येक घटकाला, प्रत्येक नागरिकाला आणि प्रत्येक राष्ट्राला सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देतो. स्वच्छता ही आरोग्याची पायरी आहे, परंतु तिच्या पुढे सामाजिक न्याय, समता, पर्यावरणीय संरक्षण आणि आर्थिक समृद्धीचेही आयाम दडलेले आहेत. त्यामुळेच या दिवसाचे समाजशास्त्रीय महत्त्व अधोरेखित होते.

स्वच्छतेचा समाजशास्त्रीय अभ्यास केला, तर दिसते की समाजातील वेगवेगळ्या गटांमध्ये स्वच्छतेच्या संकल्पना भिन्न असतात. ग्रामीण समाजातील लोक स्वच्छतेला पारंपरिक परंपरांशी जोडतात, जसे की दररोज अंगण झाडणे, शौचालयात जाऊन आल्यानंतर हातपाय धुणे, घरातील पवित्रता राखणे. शहरी समाज मात्र आधुनिक साधनसामग्रीच्या मदतीने कचरा व्यवस्थापन करतो, परंतु प्लास्टिकच्या अतिरेकी वापरामुळे शहरातील प्रदूषणाची समस्या अधिक तीव्र झाली आहे. एका गटाची अस्वच्छता दुसऱ्या गटावर आघात करते, उदा. शहरातील नाले गावाकडे वाहून जातात आणि तेथील पिण्याचे पाणी दूषित करतात. यावरून स्वच्छतेचा प्रश्न केवळ वैयक्तिक नसून सामूहिक आहे, हे स्पष्ट होते.

समाजातील असमानता आणि स्वच्छता यांचे नातेही महत्त्वाचे आहे. गरीब वस्त्यांमध्ये राहणारे लोक सुरक्षित, स्वच्छ पाणी व शौचालयाच्या सुविधांपासून वंचित असतात. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांवर त्यांना मोठा खर्च करावा लागतो, परिणामी दारिद्र्य अधिक वाढते. उलट, सधन वर्ग आरोग्यसुविधा परवडल्यामुळे या संकटापासून वाचतो. म्हणूनच स्वच्छतेचा प्रश्न हा सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. जागतिक स्वच्छता दिन या असमानतेकडे जगाचे लक्ष वेधतो आणि सर्वांना समान आरोग्यदायी वातावरण मिळवून देण्याचे आवाहन करतो.

आरोग्य आणि स्वच्छतेचे नाते तर अविभाज्यच आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार दरवर्षी लाखो लोक दूषित पाणी आणि अस्वच्छतेमुळे होणाऱ्या रोगांमुळे मृत्यूमुखी पडतात. भारतातही डेंग्यू, मलेरिया, कॉलरा अशा साथरोगांचा प्रसार अस्वच्छतेमुळे होतो. भारतात 'स्वच्छ भारत अभियान' या राष्ट्रीय उपक्रमाने खुले शौचालय निर्मूलन आणि कचरा व्यवस्थापनात लक्षणीय प्रगती साधली असली, तरीही भारतीय लोकांच्या मानसिकतेत बदल घडवण्याचे कार्य अद्याप अपूर्ण आहे. स्वच्छतेला जीवनशैलीत सामावून घेणे ही खरी आवश्यकता आहे.

पर्यावरणीय दृष्टिकोनातून पाहिले, तर कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न जगासमोर भयानक रूपात उभा आहे. प्लास्टिकच्या प्रदूषणाने समुद्री प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. औद्योगिक सांडपाण्यामुळे नद्या आणि तलावांचे पाणी विषारी झाले आहे. जंगलात पडणाऱ्या घनकचर्यामुळे जैवविविधता नष्ट होत आहे. हवामान बदलाचे वेगाने वाढणारे प्रमाणही कचरा व्यवस्थापनातील त्रुटींशी निगडित आहे. अशा परिस्थितीत जागतिक स्वच्छता दिन हा केवळ स्वच्छतेचा नव्हे, तर पर्यावरण वाचविण्याचा दिवस म्हणून पाहिला पाहिजे.

स्वच्छतेचा आर्थिक परिणाम देखील तितकाच महत्त्वाचा आहे. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांवर मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक व खाजगी खर्च होतो. कामगारशक्ती आजारी पडल्यामुळे उत्पादनक्षमता घटते. पर्यटनाच्या दृष्टीने स्वच्छ शहरं व खेडी हे नेहमीच आकर्षण ठरतात. स्वच्छता राखणारी गावे व जिल्हे हे विकासाच्या दिशेने वेगाने प्रगती करतात. म्हणूनच आर्थिक प्रगतीसाठी स्वच्छतेचे भांडवल म्हणून पाहिले पाहिजे.

संस्कृती आणि स्वच्छता यांचे नाते भारतीय समाजासाठी विशेष आहे. आपल्या धार्मिक परंपरांमध्ये स्वच्छतेला पवित्रतेचे रूप दिले गेले आहे. धार्मिक स्थळे, घरे, अंगणे स्वच्छ ठेवणे हे धार्मिक कर्तव्य मानले गेले. परंतु आज या परंपरांचा लोप होत आहे. उत्सवांमध्ये निर्माल्य, प्लास्टिक सजावट यामुळे नद्या व तळी प्रदूषित होतात. त्यामुळे स्वच्छतेची खरी परंपरा नव्या पिढीला समजावून सांगणे व ती आधुनिक जीवनशैलीशी जुळवून घेणे अत्यावश्यक आहे.

स्वच्छतेची खरी चळवळ लोकसहभागातूनच यशस्वी होऊ शकते. सरकारने कितीही योजना आखल्या तरी नागरिकांचा सहभाग नसेल, तर त्या योजनांना यश मिळणे कठीण आहे. शाळांमधील विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, स्थानिक ग्रामपंचायती या सर्वांचा सहभाग स्वच्छता चळवळीला उर्जा देतो. त्याचबरोबर कचरा गोळा करणाऱ्या कामगारांचे योगदान विसरून चालणार नाही. त्यांच्या श्रमांमुळेच शहरं व गावं स्वच्छ राहतात. त्यांना सामाजिक सन्मान व सुरक्षितता देणे ही समाजाची जबाबदारी आहे.

स्वच्छतेचा प्रश्न हा जागतिक विकास उद्दिष्टांशी थेट संबंधित आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने ठरवलेले आणि १ जानेवारी २०१६ रोजी लागू केलेले १७ शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) स्वच्छतेशिवाय साध्य होऊ शकत नाहीत. ही उद्दिष्टे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय स्थिरता साधण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारतात. गरिबी निर्मूलन, चांगले आरोग्य, लिंगसमता, शाश्वत शहरे, हवामान कृती, स्वच्छ पाणी व स्वच्छता या सर्व ध्येयांचा पाया स्वच्छतेवरच आहे. त्यामुळे जागतिक स्वच्छता दिन हा प्रत्यक्षात शाश्वत विकासाच्या अजेंड्याला गती देणारा दिवस आहे.

या सर्व विवेचनावरून असे स्पष्ट होते की जागतिक स्वच्छता दिन हा फक्त एका दिवसापुरता प्रतीकात्मक कार्यक्रम नाही, तर तो सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक बदल घडवण्याचे साधन आहे. २० सप्टेंबरचा हा दिवस प्रत्येकाला स्वतःच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देतो. आपल्या घरापासून ते शाळा, रस्ते, समाज, गाव, शहर आणि शेवटी राष्ट्र व जग या सर्व स्तरांवर स्वच्छतेची चळवळ रुजली, तरच समाज परिवर्तन शक्य आहे.

आज गरज आहे ती केवळ कचरा उचलण्याची नाही, तर मानसिकतेत बदल घडवण्याची. 'माझ्या एका कृतीने काय फरक पडणार?' ही संकुचित मानसिकता मोडून 'मी बदललो तर समाज बदलेल' ही जाणीव मनोमन स्वीकारणे ही खरी स्वच्छतेची सुरुवात आहे. जागतिक स्वच्छता दिन हाच संदेश देतो की स्वच्छता ही व्यक्तीगत सवय नसून सामूहिक संस्कृती आहे.

शेवटी, जागतिक स्वच्छता दिन आपल्याला सांगतो की स्वच्छता म्हणजे आरोग्य, पर्यावरण, अर्थकारण, सामाजिक समता आणि सांस्कृतिक मूल्ये यांचा संगम आहे. २० सप्टेंबरचा हा दिवस आपण सर्वांनी सामूहिक जबाबदारीचा दिवस म्हणून पाळला, तर तो समाजपरिवर्तनाचा पाया ठरेल. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेला जीवनशैलीत सामावून घेतले, तरच हा दिवस खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.



**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# विचार भारती व बन्सीमहाराजच्या गणेशोत्सव उत्कृष्ट आरास स्पर्धेत सिद्धेश्वर तरुण मंडळ व भिंगार येथील समर्थ युवा प्रतिष्ठान प्रथम



विचार भारती व बन्सीमहाराज मिठाईवाले यांच्या वतीने झालेल्या गणेशोत्सव उत्कृष्ट आरास स्पर्धेच्या परितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन करताना शिवशंभू व्याख्याते निलेश भिसे.

नगर - अहिल्यानगर मध्ये विचार भारती व बन्सीमहाराज मिठाईवाले यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या गणेशोत्सव उत्कृष्ट आरास स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभात पुण्याचे शिवशंभु व्याख्याने निलेश भिसे यांनी उपस्थित गणेश मंडळांच्या युवकांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुणे आमदार संग्राम जगताप, विश्व मांगल्य संस्थेच्या अध्यक्षा धनश्री विखे व महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, स्पर्धेचे प्रायोजक बन्सीमहाराज मिठाईवालेचे राजकुमार जोशी, विचार भातीचे सचिव सुधीर लांडगे, मंजुश्री कुलकर्णी, स्पर्धा प्रमुख रवींद्र बारस्कर, अंकुश गोळे, सर्व परिक्षक, विविध क्षेत्रातील नागरिक आदींसह मंडळांचे कार्यकर्ते व ढोल पथकातील वादक उपस्थित होते.

अनंत जोशी यांनी सूत्रसंचालन केले. अंकुश गोळे यांनी आभार मानले. प्रारंभी रा.स्व.संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक स्व.माधव कुलकर्णी व व.गजानन मेहेंदळे यांना सामुहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. अशोक गायकवाड, डॉ.विक्रम दीडवाणिया, सुनील नागोरी, राहुल गांधी, समाप्त नलावडे, मनोज जोशी, राहुल जामगावकर, कमलेश भंडारी, विशारद पेटकर व श्री.भिंगारदिवे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

उत्कृष्ट देखावा स्पर्धेचा निकाल पुढील-प्रमाणे - प्रथम विभागून श्री सिद्धेश्वर तरुण मंडळ तोफखाना देखावा धर्मवीर छत्रपती शिवाजी व समर्थ युवा प्रतिष्ठान भिंगार देखावा स्वराज रक्षक ताराराणी, द्वितीय विभागून सम्राट तरुण मंडळ भिंगार देखावा शिवराज्याभिषेक सोहळा व शिवगर्जना प्रतिष्ठान माणिक चौक देखावा सिंदूर देश के बेटी का. तृतीय बंगाल चौकी मित्र मंडळ देखावा दमडी. चतुर्थ विभागून नंदनवन मित्र मंडळ देखावा आई हिरकणी व चौपाटी कारंजा मित्र मंडळ ट्रस्ट देखावा गड किल्ले संवर्धन. याशिवाय उत्तेजनार्थ पारितोषिके राजयोग प्रतिष्ठान, समझोता तरुण मंडळ, क्रांतिवीर प्रतिष्ठान, बालाजी युवक मंडळ, जय हिंद तरुण मंडळ, नवग्रह मित्र मंडळ, राजमुद्रा प्रतिष्ठान व धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान. तसेच शहरातील सर्व ढोल पथक रुद्रवंश, रुद्रनाद, तालयोगी, गणांत, युगंधर, हिंदवी, शौर्य, नाद, रामराज्य, आम्ही नगरकर, श्री विशाल वाद्य पथक ढोल ढील पथकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# मानव विकास परिषदेच्या कार्यालयीन व्यवस्थापकपदी सौ.अर्चना पठारे यांची निवड



नगर - मानव विकास परिषदेच्या कार्यालयीन व्यवस्थापक पदी सौ. अर्चना योगेश पठारे यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र संस्थापक अध्यक्ष अफसर शेख यांच्या वतीने देण्यात आले. सौ. अर्चना योगेश पठारे हे विविध सामाजिक संघटनांच्या माध्यमातून सामाजिक कार्य करत आहे. त्यांचा असलेला जनसंपर्क व समाजात काम करण्याची तळमळ पाहून संस्थापक अध्यक्ष अफसर शेख यांनी नुकतीच त्यांची नियुक्ती केली. या नियुक्तीमुळे मानव विकास परिषदेच्या माध्यमातून ते सामाजिक कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले

# प्रा.सौ.उषा जैन यांना पीएच.डी. पदवी




प्रा. सौ. उषा नितीन जैन यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन जैन यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

नगर - कोपरगाव (जि. अहमदनगर) येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी कॉलेज ऑफ फार्मसीच्या महाविद्यालयाच्या प्राध्यापिका सौ. उषा नितीन जैन यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पीएच. डी. अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. त्यांना डॉ. सुनील अमुतकर (गोखले एज्युकेशन सोसायटी नाशिक) यांच्या मार्गदर्शनाखाली Design, Synthesis and Screening of Few Novel Thiazolidinedione Derivatives for Anti-diabetic Activity या विषयावर संशोधन केले. या संशोधनात नवीन थायाझोलिडिनेडायोन (TZD) डेरिव्हेटिव्हज तयार करून त्यांची प्रतिमधुमेही क्षमता तपासण्यात आली. काही संयुगांनी रक्तातील साखर कमी करण्यासह इन्सुलिन संवेदनशीलता वाढवली, तसेच लिपिडचे प्रमाणही नियंत्रित केले. विशेषतः B-TZD-13 हे संयुग Type-2 Diabetes नियंत्रणासाठी प्रभावी ठरल्याचे निष्पन्न झाले.

संशोधन कार्यकाळात प्रा.सौ. उषा जैन यांनी Scopus-Indexed जर्नल्समध्ये तीन संशोधन लेख प्रकाशित केले असून, आपल्या संशोधनाची मांडणी दोन आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये (International Conferences) सुद्धा केली आहे. त्यांच्या कार्यामध्ये थायाझोलिडिनेडायोन या औषधीय गटातील नवनवीन संयुगांचे डिझाईन, संश्लेषण व जैविक मूल्यमापन यांचा समावेश आहे. या यशाबद्दल चेअरमन सौ. बेबीताई कातकडे यांनी त्याचे अभिनंदन केले. अध्यक्ष सी. एन. कातकडे, सचिव प्रसाद कातकडे, उद्योजक विजय कडू, सिव्हिल इंजिनिअर दीपक कोटमे, प्रणीत कातकडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन जैन यांच्या हस्ते प्रा. सौ. जैन उषा यांचे सत्कार करण्यात आला.




# ...म्हणून दुखतं डोकं

डोकेदुखी ही सर्वसाधारणपणे आढळणारी समस्या. ताणतणाव, अपुरी झोप, थकवा अशा कारणांमुळे डोकं दुखू शकतं. यासोबतच काही अन्नपदार्थांच्या सेवनामुळेही डोकेदुखीचा त्रास जाणवू शकतो. आपण अनवधनाने आहार-विहाराशी संबंधित बऱ्याच चुका करतो. डोकेदुखीला कारणीभूत ठरणाऱ्या काही अन्नपदार्थांविषयी...

कुठे चुकतो आपण?

* कॅफेनच्या अतिसेवनामुळे डोकं दुखू शकतं. तसंच चहा, कॉफीसारख्या पदार्थांचं सेवन अचानक बंद केल्यास त्रास होऊ शकतो. त्यामुळे चहा, कॉफीचं सेवन मर्यादित प्रमाणात करावं.

* साखरेला पर्याय म्हणून सुक्रालोज, सॅकरिन, एससल्फेमसारखे घटक वापरले जातात. अशा घटकांच्या अतिसेवनामुळे डोकं दुखू शकतं. त्यामुळे कृत्रिम गोड पदार्थांचं सेवन टाळणं योग्य ठरतं.



* अल्कोहोलमुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते. त्यामुळे नियमित मद्यपान करणाऱ्यांना डोकेदुखीचा त्रास होतो. डोकेदुखी टाळण्यासाठी मद्यपानावर नियंत्रण आणणं गरजेचं आहे.

* चॉकलेटचं अतिसेवनही त्रासदायक ठरू शकतं. चॉकलेटमध्ये कोकोचं प्रमाण कमी असतं. तसंच यात टायरामीन, कॅफेनसारखे घटकही असतात. यामुळे डोकं दुखू शकतं.

# गर्भवती महिलांना संसर्गाचा जास्त धोका

इतर ऋतूंच्या तुलनेत पावसाळ्यात संसर्गाचा धोका अधिक वाढतो. गर्भवती महिलांना याचा सर्वाधिक धोका असतो. गर्भवती महिलांची रोगप्रतिकारकशक्ती कमी असल्याने मूत्रमार्गाचे संक्रमण (यूटीआय), विषाणूजन्य ताप, योनीमार्गात संसर्ग, डेंगी, मलेरिया, पोटाचे संसर्ग आणि कावीळ यासारखे आजार बळावण्याचा धोका जास्त असतो. पावसाळा हा गर्भवती महिलांसाठी मोठ्या प्रमाणात चिंतेचा विषय ठरतो. या दिवसात वातावरणातील आर्द्रता आणि दमटपणामुळे सर्दी आणि फ्लूसारख्या श्वसनाच्या समस्यांमध्ये वाढ होते. यामुळे खोकला, शिंका येणे आणि अंगदुखी अशी लक्षणे दिसून येतात. मिठाच्या पाण्याने गुळण्या करणे, वाफ घेणे, विविध स्वरूपातील द्रवपदार्थांचे सेवन आणि पुरेशी विश्रांती करणे गरजेचे आहे. उघड्यावरील अन्न पदार्थांचे सेवन टाळणे तसेच दूषित पाण्यामुळेदेखील पोटाच्या संसर्गाचा धोका वाढतो. त्यामुळे उलट्या, अतिसार आणि निर्जलीकरण होते. या दिवसात स्ट्रीट फुड टाळणे, योग्यरित्या शिजवलेल्या ताज्या, गरम अन्नाचे सेवन करणे, गाळून, उकळून थंड केलेले पाणी पिणे गरजेचे आहे.

डासांमुळे होणारे डेंगी आणि मलेरियासारखे आजार गर्भवती महिलांकरिता त्रासदायक ठरू शकतात. यासाठी डास प्रतिबंधक उपायांचा वापर करणे, संपूर्ण अंग झाकणारे पूर्ण बाह्यांचे कपडे घालणे आणि सांडपाण्याचा निचरा करणे यासारख्या प्रतिबंधात्मक उपायांचा अवलंब करणे योग्य ठरते. डेंगीच्या लक्षणांमध्ये तीव्र ताप, डोकेदुखी, उलट्या आणि सांधेदुखी यांचा समावेश आहे तर मलेरियामुळे ताप, थंडी वाजून येणे आणि थकवा येणे अशी लक्षणे आढळतात. विषमज्वर हा दूषित अन्न आणि पाण्याद्वारे पसरू शकतो. त्यामुळे अशक्तपणा आणि भूक न लागणे यासारख्या समस्या उदभवू शकतात. 'व्हायरल हेपेटायटीस' मुळे होणाऱ्या काविळीमुळे त्वचा आणि डोळे पिवळे होऊ शकतात. गर्भधारणेदरम्यान मूत्रमार्गाचे संसर्ग (यूटीआय) ही एक सामान्य घटना आहे आणि ती अस्वच्छता किंवा जास्त ओलावा असल्यास आणखी वाढू शकते. यासाठी श्वास घेण्यायोग्य सुती कपड्यांचा वापर करणे, भरपूर द्रव पदार्थांचे सेवन करणे आणि स्वच्छता राखणे गरजेचे आहे.



आरोग्य वार्ता

डॉ. मेघा पठारे

गर्भधारणा हा महिलांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. हंगामी संसर्गामुळे तो आव्हानात्मक ठरू शकतो. एका महिन्यात २५-३७ वयोगटातील दहापैकी पाच गर्भवती महिलांना डेंगी, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल इन्फेक्शन किंवा यूटीआयची समस्या आढळून येते. या आजाराचे कारण आणि लक्षणे निश्चित केल्यानंतर उपचारांची पद्धत ठरवली जाते. रुग्णांना स्वतःच्या मर्जीने औषधोपचार न करण्याचा सल्ला दिला जातो, कारण ते धोकादायक ठरु शकते. महिलांनी ताजे अन्न, स्वच्छ पाणी, डास प्रतिबंधात्मक उपाय तसेच वैयक्तिक स्वच्छतेवर भर दिला पाहिजे. संध्याकाळी घराबाहेर पडणे टाळावे आणि घराजवळील कुंड्यांमध्ये, टायरमध्ये किंवा भांड्यांमध्ये पावसाचे पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. कोणतीही असामान्य लक्षणे आढळल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# उच्च रक्तदाबाचा यकृतावरही परिणाम

उच्च रक्तदाबाला अनेकदा 'सायलेंट किलर' म्हटले जाते. कारण हा आजार फक्त हृदयावरच परिणाम करत नाही, तर हळूहळू यकृतालाही नुकसान पोहोचवतो. अनेक वेळा लोक त्याची लक्षणे थकवा, ताणतणाव किंवा वाढत्या वयाशी जोडून दुर्लक्ष करतात. एका अभ्यासानुसार उच्च रक्तदाब असलेल्यांना 'लिव्हर फायब्रोसिस'चा धोका जास्त असतो. मेटाबॉलिक समस्येमुळे फॅटी लिव्हरची समस्या असलेल्यांमध्ये हा धोका आणखी वाढतो.

आरोग्यवेध

डॉ. गोविंद भोसले

**सतत थकवा आणि सुस्ती**

पुरेशी विश्रांती घेतल्यानंतरही शरीर थकल्यासारखे वाटत असेल किंवा नेहमीच सुस्ती जाणवत असेल तर हे यकृतावरील ताणाचे लक्षण असू शकते. उच्च रक्तदाबामुळे यकृताचे काम बिघडते आणि शरीरातील ऊर्जानिर्मिती आणि पोषक तत्वांचे नीट शोषण होत नाही. हा थकवा साध्या थकव्यापेक्षा वेगळा असतो.

**पोटात वेदना**

उजव्या बाजूच्या वरच्या पोटात वेदना किंवा जडपणा जाणवणे हे यकृतात सूज किंवा लिव्हर वाढल्याचे लक्षण असू शकते. बरेचदा लोक अपचन किंवा गॅसचा त्रास मानून याकडे दुर्लक्ष करतात; मात्र अल्ट्रासाऊंडसारख्या तपासण्यांमुळे वेळेत लिव्हर एन्लार्जमेंट ओळखता येते आणि गंभीर नुकसान टाळता येऊ शकते.

**पिवळेपणा आणि त्वचेतील बदल**


त्वचा किंवा डोळ्यांमध्ये थोडासा पिवळसरपणा दिसणे हे यकृत बिघडल्याचे स्पष्ट संकेत आहे. उच्च रक्तदाबामुळे यकृताच्या समस्या वाढू शकतात आणि त्यातून बिलिरुबिनची पातळी वाढते. त्वचेतील अगदी हलके रंगबदलही दुर्लक्षित करू नयेत.

# सतत थकवा येतोय...

बऱ्याचजणांना दिवसभर थकवा जाणवतो. दुपारच्या जेवणानंतर झोप येते. सकाळी उठल्यानंतर ताजंतवानं वाटत नाही. हा थकवा दूर करून दिवसभर उत्साह टिकवून ठेवायचा असेल तर आहारात काही पदार्थांचा समावेश करता येईल.

* उन्हाळ्यात कलिंगड खाता येईल. शरीरात पाण्याची कमतरता निर्माण झाली की दिवसभर थकल्यासारखं वाटतं. म्हणूनच कलिंगडासारख्या रसाळ पदार्थांचं सेवन वाढवायला हवं. कलिंगडात ९० टक्के पाणी असतं. तसंच यात जीवनसत्त्वं आणि पोषक घटक असतात. त्यामुळे तुम्ही ताजेतवाने होता.

* बदाम खाल्ल्यामुळे अंगात दिवसभर उत्साह टिकून राहतो. बदामातल्या 'ब' जीवनसत्त्वामुळे अन्नाचं रुपांतर ऊर्जेत होतं. बदामात मॅग्नेशियम हा घटक असतो. मॅग्नेशियममुळे स्नायूंचा थकवा दूर होतो.



काय खावं?

* अंड्यातली प्रथिनं आणि आरोग्यदायी फॅट्समुळे उत्साह दिवसभर टिकून राहतो. यात लोह, बी १२ आणि 'ड' ही जीवनसत्त्वं असतात.

* सफरचंदामुळे मेंदू आणि शरीराला ऊर्जेचा पुरवठा होत राहतो. यात फ्रुक्टोज हा घटक असतो. फ्रुक्टोसमुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि आपण दिवसभर ताजचतवानं राहतो.

* केळं हा सुद्धा ऊर्जेचा खूप चांगला स्रोत आहे. यात पोटॅशियम आणि फायबर हे घटक असतात. केळ्यातल्या फायबरमुळे साखर रक्तात शिरण्याचा वेग मंदावतो. तसंच केळ्यातून 'ब' जीवनसत्त्व आणि मॅग्नेशियम हे घटकही मिळतात.

# मानेभोवतीचा काळेपणा दुर्लक्षू नका

मानेभोवती काळेपणा ही एक सामान्य समस्या आहे. मानेचा काळेपणा किंवा त्याभोवतीची त्वचा काळी पडणे हे कधी कधी शरीरात होणाऱ्या काही बदलांचे लक्षण असू शकते. मानेवर काळे डाग किंवा वर्तुळे दिसू लागल्यास दुर्लक्ष करू नये. हे शरीराच्या आत होणाऱ्या आरोग्य समस्येचे लक्षण असू शकते. ते वेळीच ओळखणे आणि उपचार करणे खूप महत्वाचे आहे.

बरेच लोक अनेकदा चेहऱ्याचे सौंदर्य राखताना मानेकडे लक्ष देत नाहीत. मानेची त्वचा चेहऱ्यापेक्षा जास्त संवेदनशील असते आणि त्यावर धूळ, घाम आणि घाण सहजपणे जमा होऊ शकते. त्यामुळे त्वचेचा रंग बदलू शकतो. कधी कधी हा बदल फक्त बाहेरूनच दिसून येतो आणि वेळेवर योग्य उपाययोजना करून बरा करता येतो; परंतु कधी कधी तो शरीरात होणाऱ्या मोठ्या बदलाचे लक्षणदेखील असू शकतो. मानेतील काळेपणाची अनेक कारणे असू शकतात. यापैकी काही कारणे आपल्या जीवनशैलीशी संबंधित आहेत, तर काही गंभीर आरोग्य समस्यांशी संबंधित असू शकतात.

मानेवरील काळेपणाची कारणे

मानेवरील त्वचा खूप संवेदनशील असते आणि ती चेहऱ्याच्या त्वचेपेक्षा वेगळी असते. त्यामुळे चेहऱ्याच्या त्वचेकडे लक्ष देऊनही, मानेवरील त्वचेकडे दुर्लक्ष केले जाते. यामुळे मानेवर घाण, घाम आणि धूळ साचते. त्यामुळे काळेपणा येऊ शकतो. चुकीचे अन्न आणि त्वचेची योग्य काळजी न घेतल्यानेदेखील मानेचा काळेपणा येऊ शकतो. अस्वास्थ्यकारक अन्न, विशेषतः जंक फूड आणि जास्त साखरेचे सेवन, त्वचेच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम करू शकते. कधी कधी शरीरातील हार्मोनल असंतुलनामुळे मानेचा काळेपणा वाढू शकतो. विशेषतः महिलांमध्ये, पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम (पीसीओएस) सारख्या स्थितीत इन्सुलिनची पातळी वाढल्यामुळे मानेवरील काळेपणा वाढू शकतो. याशिवाय, मधुमेहाने ग्रस्त असलेल्या लोकांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण जास्त असते आणि यामुळे मानेवर काळेपणा येऊ शकतो. याशिवाय उच्च इन्सुलिन पातळीमुळे त्वचेचा काळेपणा येतो. कुशिंग सिंड्रोम या स्थितीमध्ये शरीरात कोर्टिसोल हार्मोनची पातळी वाढते. ही स्थिती गंभीर आजाराचे लक्षण असू शकते. त्यामुळे मानेवर काळेपणा दिसून येतो.



आरोग्यमंत्र

डॉ. महेश दळे

**मानेवरील काळेपणाशी संबंधित आजारांची लक्षणे**

* **रक्तातील साखर आणि इन्सुलिन असंतुलनः** मानेभोवती काळी वर्तुळे असणे हे मधुमेह किंवा इन्सुलिन प्रतिरोधकता सारख्या समस्या असल्याचे लक्षण असू शकते.

* **हार्मोनल बदलः** 'पीसीओएस' किंवा इतर हार्मोनल असंतुलनसारख्या समस्यांमुळे मानेवर काळेपणा येऊ शकतो.

* **कुशिंग सिंड्रोमः** शरीरात कोर्टिसोल हार्मोनची पातळी वाढत असल्यामुळेदेखील मानेवर काळेपणा येऊ शकतो.




# स्टेथोस्कोपमधील 'एआय' शोधतो १५ सेंकदात आजार

तंत्रज्ञान आणि आरोग्यसेवेचा समन्वय आता पूर्वीपेक्षाही जलद झाला आहे. आता स्टेथोस्कोपमध्येही कृत्रिम बुद्धिमत्ते(एआय)ने प्रवेश केला आहे. रुग्णांचे आरोग्य योग्यरित्या पाहण्यासाठी हे नवीन तंत्रज्ञान डॉक्टरांना खूप उपयुक्त ठरत आहे. विशेष म्हणजे आता फक्त १५ सेकंदात अनेक आजार शोधता येतात.

**'एआय' स्टेथोस्कोप कसा काम करतो?**

या स्मार्ट स्टेथोस्कोपमध्ये सेन्सर्स आणि 'एआय अल्गोरिदम' आहेत. डॉक्टर तो रुग्णाच्या छातीवर किंवा पाठीवर ठेवतात आणि श्वास ऐकतात तेव्हा ते आवाज रेकॉर्ड करतात. 'एआय' त्या आवाजाचे विश्लेषण करते आणि रुग्णाला हृदय, फुफ्फुस किंवा इतर अवयवांच्या आजाराचा धोका आहे की नाही, हे काही सेकंदात सांगते.

**कोणते आजार शोधता येतात?**

नवसंशोधन

डॉ. कुंदन गायकवाड


'एआय स्टेथोस्कोप'ने काही मोठे आजार लवकर शोधता येतात. त्यामुळे हृदयाचा आवाज, हृदयविकाराचा झटका, हृदय अपयशाचे संकेत मिळतात. त्याचबरोबर दमा, ब्रॉंकायटिस, फुफ्फुसात पाणी होणे आदीबाबत ते माहिती देते. उच्च रक्तदाब किंवा अडथळा, संसर्ग आणि दाह आदींची माहिती ते देते. पूर्वी, डॉक्टर रुग्णाचा श्वास ऐकून किंवा छातीची तपासणी करून रोगाचे निदान करण्यासाठी काही मिनिटे किंवा तास घेत असत. 'एआय स्टेथोस्कोप'द्वारे ही प्रक्रिया फक्त १५ सेकंदात पूर्ण होते. त्यामुळे वेळ आणि मेहनत दोन्ही वाचतात. याशिवाय, सुरुवातीच्या टप्प्यात रोग आढळल्यास उपचार जलद आणि सोपे होतात. 'एआय स्टेथोस्कोप' डॉक्टरांना मदत करते; परंतु ते त्यांची जागा घेऊ शकत नाही. विशेषज्ञ डॉक्टर सहज उपलब्ध नसलेल्या ठिकाणी, विशेषतः दुर्गम आणि ग्रामीण भागात हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरु शकते.

**भविष्यातील शक्यता**

'एआय'च्या या वापरामुळे, आरोग्यसेवेमध्ये रिअल-टाइम देखरेख आणि चांगले अंदाज मिळवणे शक्य आहे. भविष्यात, हे तंत्रज्ञान अधिक स्मार्ट होईल आणि स्वयंचलित अहवाल आणि डेटा विश्लेषणदेखील करेल. स्टेथोस्कोपमध्ये 'एआय'चा प्रवेश आरोग्यसेवेसाठी एक क्रांतिकारी बदल आहे. यामुळे डॉक्टरांना रोग लवकर, अचूक आणि सुरुवातीच्या टप्प्यात ओळखण्यास मदत होते. आता फक्त १५ सेकंदात रुग्णाच्या आरोग्याचे मूल्यांकन करणे शक्य आहे, जेणेकरून उपचार लवकर सुरू करता येतील आणि रुग्णांचे प्राणही वाचू शकतील.

# लाभदायी पदाभ्यंग

आयुर्वेदात पायांना प्रचंड महत्त्व आहे. आपले पाय शरीराचा आधारस्तंभ आहेत. म्हणूनच त्यांची नीट काळजी घ्यायला हवी. पायाच्या नसांना आराम द्यायला हवा. यासाठी आयुर्वेदात पदाभ्यंग नावाचा मसाज सांगितला आहे. हा मसाज अत्यंत आरामदायी आहे. आयुर्वेदिक तेलांनी पायांना मसाज केल्यामुळे नसांवरचा ताण कमी होतो आणि पर्यायाने सर्वांगिण आरोग्य सुधारतं. पायांना मसाज केल्यानंतर संपूर्ण शरीरातल्या अवयवांना आराम मिळतो. पदाभ्यंग रात्री झोपण्याआधी करण्याचा मसाज आहे. दररोज पदाभ्यंग केल्यामुळे अनेक लाभ मिळतात. पदाभ्यंगामुळे शरीरातल्या त्रिदोषांचं संतुलन साधलं जातं. पदाभ्यंगामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. यामुळे प्रतिकारशक्तीशी संबंधित आजारांना आळा घालता येतो. पदाभ्यंगामुळे मानसिक ताणतणाव, अस्वस्थता, भीती, काळजी या मानसिक आजारांची तीव्रता कमी होते. मानसिक शांतता लाभते. निद्रानाशाची समस्या असेल तर पदाभ्यंग करून घेता येईल. पदाभ्यंगामुळे रक्ताभिसरण सुधारतं, दृष्टिदोष दूर होतात, श्रवणशक्ती सुधारते.




आयुर्वेद आणि विकार

# 'इंटरमिटंट फास्टिंग'

आजकाल वजन कमी करण्यासाठी आणि फिट राहण्यासाठी लोक अनेक प्रकारच्या डाएट पद्धतींचा वापर करतात. त्यातलीच सर्वात लोकप्रिय पद्धत म्हणजे 'इंटरमिटंट फास्टिंग', पण ही पद्धत खरोखरच सुरक्षित आहे का? 'जर्नल ऑफ अमेरिकन हार्ट असोसिएशन' मध्ये प्रकाशित झालेल्या एका महत्त्वाच्या संशोधनाने हे दाखवून दिले आहे, की 'इंटरमिटंट फास्टिंग'मुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. या अभ्यासात हजारो लोकांचे दीर्घकाळ निरीक्षण करून निष्कर्ष काढण्यात आला. त्यात दिसून आले की 'इंटरमिटंट फास्टिंग' करणाऱ्यांना हृदयरोग आणि स्ट्रोकमुळे मृत्यू होण्याचा धोका अधिक असतो. म्हणजेच ही पद्धत अल्पकाळासाठी काहींना फायदेशीर ठरली, तरी पुढे आरोग्यास हानीकारक ठरू शकते.

**'इंटरमिटंट फास्टिंग' म्हणजे काय?**

या डाएट पद्धतीत लोक आपल्या खाण्याचे वेळापत्रक ठरवतात. उदाहरणार्थ १६ तास उपवास आणि आठ तास खाण्याची वेळ. असे केल्याने शरीरातील चरबी लवकर कमी होते, मेटाबॉलिझम सुधारतो असे मानले जाते; पण हे 'इंटरमिटंट फास्टिंग' चालू ठेवले किंवा योग्य आहार घेतला नाही, तर शरीराला आवश्यक पोषकतत्वांची कमतरता भासते.



घ्या काळजी

डॉ. प्रसन्न नेने

**कोणते दुष्परिणाम?**

* पोषणाची कमतरतताः ठराविक वेळेत मर्यादित आहारामुळे व्हिटॅमिन्स आणि मिनरल्सची कमतरता भासू शकते.

* **हृदयविकाराचा धोकाः** संशोधनानुसार, दीर्घकाळ या पद्धतीचा अवलंब केल्यास हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढतो.

* **ब्लड शुगर असंतुलनः** मधुमेह असलेल्या रुग्णांमध्ये साखरेचे प्रमाण अचानक कमी जास्त होऊ शकते.

नवसंशोधन


## धूम्रपानामुळे



धूम्रपानामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल आपण जाणतो. धूम्रपानामुळे शारीरिक आरोग्य धोक्यात येतच, शिवाय मानसिक आरोग्यावरही दुष्परिणाम होतात. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. धूम्रपान, नैराश्य आणि चिंता यांच्यातला परस्परसंबंध दाखवून देणारा शोध नुकताच प्रसिद्ध झाला आहे. म्हणजे धूम्रपानामुळे आपलं मानसिक आरोग्य धोक्यात येऊ शकतं. धूम्रपान करणारे लोक नैराश्याला बळी पडण्याची शक्यता दुपटीने अधिक असल्याचं या संशोधनातून समोर आलं आहे. यामुळे धूम्रपानाचं प्रमाण कमी करणं गरजेचं आहे.

दंतारोग्य

## मुलांचे दात येताना



दात येणं हा प्रत्येक बाळाच्या शारीरिक जडणघडणीतला महत्त्वाचा टप्पा मानला जातो. काही मुलं दात येण्याच्या प्रक्रियेतून सहज तरून जातात तर काही मुलांना खूप त्रास होतो. दात येण्याआधी काही मुलांच्या हिरड्या सुजतात. काहींना हिरड्यांमध्ये वेदना जाणवतात. यामुळे बाळ अस्वस्थ होतं. म्हणूनच या काळात मुलं रडतात, चिडचिड करतात. त्यांना भूक लागत नाही. काही मुलं झोपतही नाहीत. त्यामुळे या काळात मुलांची विशेष काळजी घेणं गरजेचं आहे.

जपणूक त्वचेची

## वय वाढल्याच्या खुणा...



वय वाढल्याच्या खुणा त्वचेवर दिसू लागतात. खाद्यतेलापासून आहारातले विविध घटक त्वचेच्या आरोग्यावर परिणाम करतात. वय वाढल्याच्या खुणांमुळे त्वचा निस्तेज दिसू लागते. आपली त्वचा नैसर्गिक तजेला हरवून बसते. यामुळे हाडं आणि नसा दिसू लागतात. ही समस्या दूर करण्यासाठी भरपूर पाणी प्या. ग्रीन टीमुळेही त्वचेला तजेला मिळू शकतो. पोषक आहार, फळांचं सेवनही उपयुक्त ठरू शकतं. चिया सीड्स तसंच ॲव्हाकॅडोमुळेही त्वचेला आवश्यक पोषण मिळतं.

आजीबाईचा बटवा

## लाभदायी मखाणे



मखाणे खूप आरोग्यदायी आहेत. त्याच्या नियमित सेवनामुळे विविध प्रकारच्या आजारांपासून मुक्ती मिळू शकते. मखाण्यांमध्ये फॅट्सचं प्रमाण बरंच कमी तर फायबरचं प्रमाण बरंच जास्त असतं. सोडियमही बरंच कमी असतं. सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी मखाणे खाल्ल्यामुळे रक्तातली साखर नियंत्रणात राहू शकते. मखाणे हृदयाच्या आरोग्यासाठीही चांगले आहेत. यासोबतच बद्धकोष्ठता, निद्रानाश अशा विकारांवरही ते उपयुक्त ठरतात.

